१८२७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
ग्रं. क्र. १६३२

उन्नतीचा खरा मार्ग

REFBK-0001906

ग्रं. सं. ठाणें
निबंध
१५२६

# खरा मार्ग.



REFBK-0001906

महादेव गणेश गोर.

संपादक मधुकर.

१९०६

मधुकर ऑफीस, दादर–मुंबई. } सन १९२१. { किंमत १२ आणे.

मुद्रक–
प्रभाशंकर जयशंकर फाठक,
पुरंदरे कं. प्रि. प्रेस, नं. ३
ठाकुरद्वार–मुंबई.

प्रकाशक–
महादेव गणेश गोरे,
६९१ वी कुंभारवाडा,
दादर–मुंबई.

रा.नि. ४२८

# प्रस्तावना.

हें पुस्तक अमुक ग्रंथाचे आधारानें लिहिलें आहे असें सांगतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें तें स्वतंत्र आहे असेंहि ह्मणतां येणार नाहीं.

वुइलिअम मॅथ्यू, पीटर केरी, मार्डन, यांचीं कांहीं पुस्तकें व कांहीं मराठी पुस्तकें वाचीत असतांना घेतलेलीं टिपणें व सुचलेले विचार, यांच्या आधारानें हें पुस्तक लिहिलें आहे.

वरील ग्रंथकारांचीं पुस्तकें पंधरा वीस वर्षांचे वयाचे सुमारास माझे हातीं आलीं असतीं तर फार फायदा झाला असता. योग्य मार्गदर्शकाचे अभावीं ठेंचाळत, अडखळत, मार्ग काढावा लागल्यामुळें माझीं बरींच वर्षें फुकट गेलीं. सर्व गोष्टींत नेमस्तपणानें वागत असतांहि शरीराकडे द्यावें तितकें लक्ष न देतां काम करीत राहिल्यामुळें प्रकृती बिघडली, काम होईनासें झालें, सार्वजानिक कामांतून आंग काढून घ्यावें लागलें व स्वतःचीही स्थिती सुधारतां आली नाहीं. वरील ग्रंथकारांचीं पुस्तकें योग्यवेळीं मी वाचलीं असतीं तर अशी स्थिती झाली नसती असें मला वाटतें.

अलीकडे हीं पुस्तकें वाचल्यापासून, माझा उत्साह वाढून अधीक उमेद चढली, प्रकृती सुधारली व यावर्षीं गेल्या तीन चार वर्षांपेक्षां जास्त काम करतां येऊं लागलें आणि तें अधीक पद्धतशीर व योग्य

मार्गानें होऊं लागल्यामुळें अधीक फलदायी झाल्यावांचून रहाणार नाहीं अशी खात्री वाटूं लागली आहे.

वरील पुस्तकें चांगलीं आहेत खरीं, तरी पण तीं इंग्रजींत लिहिलेलीं असल्यामुळें मराठी जाणणाऱ्या बांधवांस त्यांचा उपयोग होणार नाहीं; शिवाय तीं तिकडील लोकांकरतां लिहिलेलीं आहेत, आमच्याकरतां नाहींत. आमची परिस्थिती, आमची परंपरा, आमच्या समजुती, आमच्या चालीरीति, आमच्या आवडीनावडी व आमचे गुणावगुण तिकडच्यापेक्षां अगदीं भिन्न असल्यामुळें, तीं पुस्तकें आह्मांस व्हावीं तितकीं उपयुक्त होत नाहींत. याकरतां माझ्या समजुतीप्रमाणें महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांस, तरुणांस व संसारी लोकांसह्हि उपयुक्त होईल असें हें पुस्तक लिहिलें आहे. याचा थोडाबहुत उपयोग झाला तरी मला समाधान वाटेल.

या पुस्तकाचा दुसरा भागहि लवकरच प्रसिद्ध होईल.

पुस्तक परिक्षकांनीं उपयुक्त सूचना केल्यास आभारी होईन.

मधुकर–आफीस,
दादर–मुंबई.
१९।१।२१.

आपला नम्र बंधु,
**महादेव गणेश गोरे.**

# उन्नतीचा खरा मार्ग.

## असें कां होतें ?

सर्व साधनें अनुकूल असूनहि श्रीमंतांचीं बरींच मुलें नादान निपजतात आणि कोणतींहि साधनें अनुकूल नसताना गरिबांचीं कांहीं मुलें विद्या शिकून आपली स्थिती सुधारतात. उलट श्रीमंतांचीं कांहीं मुलें विद्वान् व कर्तृत्ववान् निपजून घराण्याच्या लौकिकांत भर घालतात, आणि गरिबांचीं कांहीं मुलें कुलांगार निपजतात. त्याचप्रमाणे लहानपणीं शाळेंत हुषार ह्मणून नांवाजलेल्या मुलांपैकीं बरींच मुलें मोठेपणी नांवालौकिकांस न चढतां सामान्य लोकांप्रमाणें उदरंभरण करीत रहातात आणि शाळेंत मध्यम प्रतींचीं ह्मणून गणलेल्या मुलांपैकीं कांहीं मोठीं कर्तृत्ववान निपजतात; इतकेंच नव्हे तर शाळेंत अगदीं मठ्ठ ह्मणून प्रसिद्ध असलेल्या मुलांपैकींहि कांहीं मुलें मोठेपणीं मोठीं कर्तृत्ववान् व भाग्यवान् निपजतात.

यावरून असें दिसून येतें कीं, केवळ अनुकूल परिस्थिती किंवा बुद्धि असली ह्मणजे मनुष्याचा भाग्योदय होतो, असें नाहीं; त्याचप्र-

माणें प्रतिकूल परिस्थिती किंवा बुद्धिमांद्य भाग्योदयाचे आड येतें असेंहि नाहीं.

आपण आपल्या माहितीच्या मनुष्यांच्या आयुष्यक्रमाकडे लक्ष दिलें असतां, लहानपणीं शाळेंत हुषार म्हणून नावाजलेलीं बरींच मुलें मॅट्रीकची परिक्षा पास होऊं शकलीं नाहींत, कालेजांत हुषार गणलेलीं मुलें नोकरीधंद्यांत मागें पडून राहिलीं आणि शाळेंतील व कालेजांतील साधारण प्रतीच्या मुलांपैकीं कांहीं मुलें मोठीं कर्तृत्ववान् निपजलीं किंवा श्रीमान् झालीं असें आढळून येईल.

ज्यांची बुद्धि सामान्य प्रतीची, ज्यांच्या आंगीं विशेष असा कोणताहि गुण नाहीं, परिस्थिती अनुकूल नाहीं, अशीं मुलें कर्तृत्ववान् निपजावीं, श्रीमंत व्हावीं आणि गुणी व बुद्धिमान् मुलें मागें पडावीं हा काय चमत्कार आहे; असा विचार मनांत येऊन मनुष्याचें मन गोंधळून जाऊन अखेरीस तो नशिबाचा आश्रय करतो व या सर्व चमत्काराचें कारण ‘ नशीब ’ असें ठरवतो.

पण ही निवळ चूक आहे. जे गृहस्थ भाग्याला चढलेले दिसतात, त्यांचा भाग्योदय त्यांच्या आंगच्या गुणांमुळें व उद्योगामुळेंच झालेला असतो, नशिबानें झालेला नसतो. तुम्हीं त्यांच्या संबंधें बारीक माहिती मिळवाल तर असें दिसून येईल कीं, त्यांचे अंगीं उद्योगीपणा, चिकाटी, सचोटी वगैरे अनेक गुण असून त्यांना अतीशय मेहनत करावी लागली, अनेक अडचणींना तोंड द्यावें लागलें, सुखावर पाणी सोडून एकनिष्ठेने काम करीत रहावें लागलें, तेव्हांच त्यांचा भाग्योदय झाला.

आपण ह्मणाल कीं, ‘ या भाग्यवान् मनुष्यांचे अंगीं विशेष असा कोणताही गुण नाहीं किंवा ते विशेष बुद्धिवानहि नाहींत, असें असून हे सामान्य प्रतीचे लोक भाग्याला चढले आणि बुद्धिमान् व गुणी मनुष्यें उद्योग करीत असूनही रखडत पडलीं, तेव्हां याला ‘ नशीब ’ नाहीं ह्मणावयाचें तर काय ह्मणावयाचें ? ’

याचें उत्तर असें आहे कीं, ‘ बुद्धि असली किंवा आंगीं कांहीं उत्तम गुण असले ह्मणजे तो मनुष्य भाग्याला चढला पाहिजे ’ हा समजच चुकीचा आहे. लोकांचा हा निवळ गैरसमज आहे; आणि हा फार घातक आहे. या गैरसमजामुळें हजारों लोकांचें नुकसान झालें आहे.

बुद्धि व गुण भाग्योदयास उपयोगीं पडतात हें खरें, पण नुसत्या बुद्धिबलानें व उत्तम गुणानीं कोणालाहि भाग्यवान् होतां येत नाहीं. हें नीट लक्षांत यावें म्हणून आपण एक उदाहरण घेऊं. समजा, एका मनुष्याजवळ उत्तम जमीन आणि मुबलक पाणी आहे, तर त्याला भरपूर धान्य मिळेल का ? नाहीं. नुसती उत्तम जमीन व मुबलक पाणी असून भरपूर धान्य पदरांत पडणार नाहीं. धान्य भरपूर पदरांत पडण्यास दुसऱ्याहि कांहीं गोष्टींची अनुकूलता पाहिजे. पहिल्यानें त्या जमिनींत कोणतें पीक चांगलें येईल याचा विचार करून धान्य पेरलें पाहिजे. भात पिकण्या योग्य जमिनींत गहूं पेरतां कामा नये. शिवाय उत्तम नांगरणी, पेरणी, खत, पाणी, बेणणी, कापणी, मळणी आणि राखण होईल तरच मुबलक धान्य पदरांत पडेल. त्याच

न्यायानें नुसती उत्तम बुद्धि किंवा गुण असून भाग्योदय होणार नाहीं. पहिल्यानें योग्य धंद्याची निवड केली पाहिजे, त्याची पूर्ण माहिती करून घेतली पाहिजे; सचोटी, चिकाटी इत्यादि गुण पाहिजेत, नेटानें उद्योग करून अडचणींतून मार्ग काढला पाहिजे म्हणजे अखेरीस भाग्योदय होतो.

मध्यम प्रतीचीं माणसें पुढें सरसावतात आणि पहिल्या प्रतीचीं मागें पडतात याचें कारण, उत्तम मनुष्यांचे अंगीं बुद्धिमत्ता किंवा कांहीं गुण पूर्णत्वानें असतात खरे पण भाग्योदयाला अवश्य लागणाऱ्या दुसऱ्या गुणांचा त्यांचे अंगीं अभाव असतो; आणि जे मध्यम प्रतीचे लोक पुढें सरसावतात, त्यांचे आंगी बुद्धिमत्ता साधारणच असते पण भाग्योदयास लागणारे सर्व गुण त्यांचे आंगीं मध्यम प्रमाणानें असतात; यामुळें त्यांस यश येतें व यशानें यश वाढत जाऊन त्यांची भरभराट होते.

हें असें कां होतें हें नीटपणें लक्षांत यावें म्हणून एक उदाहरण घेऊं. समजा, पंचामृत करावयाचें आहे. तें करण्यास, गूळ, चिंच, मिरच्या, कोथिंबीर, खोबरें, भुईमुगाचे दाणे, तीळ, मीठ वगैरे सामान लागतें. एका मनुष्याजवळ गूळ उत्तम आहे, चिंच चांगली आहे, मिरच्या ताज्या आहेत पण इतर जिन्नस नाहींत, तर त्याला पंचामृत कसें साधणार ! दुसऱ्या मनुष्याजवळ गूळ साधारण प्रतीचा आहे, चिंच मध्यम आहे, मिरच्या शिळ्या आहेत व इतर जिन्नसहि मध्यम प्रतीचे पण सर्व आहेत, तर हा मनुष्य पंचामृत तयार करील.

यावरून लक्षांत येईल कीं, कांहीं गुण पूर्णत्वानें असून कांहीं गुणाचा अभाव असेल तर भाग्योदय (पंचामृत) होणार नाहीं; आणि मध्यम प्रतीचे कां होईना पण सर्व गुण अंगीं असतील तर भाग्योदय होण्यास अडचण पडणार नाहीं. तेव्हां मध्यम प्रतीचे लोक पुढें कां सरतात आणि बुद्धिवान् लोक रखडत कां पडतात याचें उत्तर 'बुद्धिवान लोकांचे अंगीं, भाग्योदय होण्यास अवश्य असलेले कांहीं गुण नसतात, यामुळें ते रखडत पडतात.' हेंच आहे.

याकरितां बुद्धिवान् मनुष्यांनीं भाग्योदयास जरूर ते गुण संपादण्यास आळस करूं नये. त्याचप्रमाणें मंदबुद्धीच्या लोकांनीहि लक्षांत ठेवावें कीं, जरूर ते गुण मध्यम प्रमाणानें आंगीं असले तरी देखील भाग्योदय होण्यास अडचण पडत नाहीं. तेव्हां बुद्धिवानास आणि त्याचप्रमाणें मध्यम प्रतीच्या लोकांसहि आपला भाग्योदय करून घेतां येतो हें सर्वांनीं अवश्य लक्षांत ठेवावें.

आतां भाग्योदय होण्यास कोणत्या गैरसमजांना पायांखालीं तुडवलें पाहिजे, कोणत्या सत्यसिद्धांतावर नजर ठेवून उद्योग केला पाहिजे, कोणते गुण संपादन केले पाहिजेत, आणि कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे याचा विचार पुढील भागांतून होईल.

*     *     *

न्यायानें नुसती उत्तम बुद्धि किंवा गुण असून भाग्योदय होणार नाहीं. पहिल्यानें योग्य धंद्याची निवड केली पाहिजे, त्याची पूर्ण माहिती करून घेतली पाहिजे; सचोटी, चिकाटी इत्यादि गुण पाहिजेत, नेटानें उद्योग करून अडचणींतून मार्ग काढला पाहिजे म्हणजे अखेरीस भाग्योदय होतो.

मध्यम प्रतीचीं माणसें पुढें सरसावतात आणि पहिल्या प्रतीचीं मागें पडतात याचें कारण, उत्तम मनुष्यांचे अंगीं बुद्धिमत्ता किंवा कांहीं गुण पूर्णत्वानें असतात खरे पण भाग्योदयाला अवश्य लागणाऱ्या दुसऱ्या गुणांचा त्यांचे अंगीं अभाव असतो; आणि जे मध्यम प्रतीचे लोक पुढें सरसावतात, त्यांचे आंगी बुद्धिमत्ता साधारणच असते पण भाग्योदयास लागणारे सर्व गुण त्यांचे आंगीं मध्यम प्रमाणानें असतात; यामुळें त्यांस यश येतें व यशानें यश वाढत जाऊन त्यांची भरभराट होते.

हें असें कां होतें हें नीटपणें लक्षांत यावें म्हणून एक उदाहरण घेऊं. समजा, पंचामृत करावयाचें आहे. तें करण्यास, गूळ, चिंच, मिरच्या, कोथिंबीर, खोबरें, भुईमुगाचे दाणे, तीळ, मीठ वगैरे सामान लागतें. एका मनुष्याजवळ गूळ उत्तम आहे, चिंच चांगली आहे, मिरच्या ताज्या आहेत पण इतर जिन्नस नाहींत, तर त्याला पंचामृत कसें साधणार ! दुसऱ्या मनुष्याजवळ गूळ साधारण प्रतीचा आहे, चिंच मध्यम आहे, मिरच्या शिळ्या आहेत व इतर जिन्नसहि मध्यम प्रतीचे पण सर्व आहेत, तर हा मनुष्य पंचामृत तयार करील.

यावरून लक्षांत येईल कीं, कांहीं गुण पूर्णत्वानें असून कांहीं गुणाचा अभाव असेल तर भाग्योदय (पंचामृत) होणार नाहीं; आणि मध्यम प्रतीचे कां होईना पण सर्व गुण अंगीं असतील तर भाग्योदय होण्यास अडचण पडणार नाहीं. तेव्हां मध्यम प्रतीचे लोक पुढें कां सरतात आणि बुद्धिवान् लोक रखडत कां पडतात याचें उत्तर 'बुद्धिवान लोकांचे अंगीं, भाग्योदय होण्यास अवश्य असलेले कांहीं गुण नसतात, यामुळें ते रखडत पडतात.' हेंच आहे.

याकरितां बुद्धिवान् मनुष्यांनीं भाग्योदयास जरूर ते गुण संपादण्यास आळस करूं नये. त्याचप्रमाणें मंदबुद्धीच्या लोकांनीहि लक्षांत ठेवावें कीं, जरूर ते गुण मध्यम प्रमाणानें आंगीं असले तरी देखील भाग्योदय होण्यास अडचण पडत नाहीं. तेव्हां बुद्धिवानास आणि त्याचप्रमाणें मध्यम प्रतीच्या लोकांसहि आपला भाग्योदय करून घेतां येतो हें सर्वांनीं अवश्य लक्षांत ठेवावें.

आतां भाग्योदय होण्यास कोणत्या गैरसमजांना पायांखालीं तुडवलें पाहिजे, कोणत्या सत्यसिद्धांतावर नजर ठेवून उद्योग केला पाहिजे, कोणते गुण संपादन केले पाहिजेत, आणि कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे याचा विचार पुढील भागांतून होईल.

* * *

# सुदैवी कसें व्हावें !

भाग्योदयाला कोणते गुण लागतात याचा विचार करण्यापूर्वीं 'नशीब' ऊर्फ 'दैव' ह्मणून ज्याला ह्मणतात त्या संबंधानें थोडा विचार करणें जरूर आहे.

'नशीब' अथवा 'दैव' या शब्दाला विनापराधें जितके शिव्या शाप सहन करावे लागतात, तितके दुसऱ्या कोणत्याहि शब्दाला सहन करावे लागत नसतील. कोणत्याहि कामांत अपयश आलें किंवा एखादें काम मनाप्रमाणें झालें नाहीं कीं, त्याचा दोष नशिबाकडे लावावयाचा, असा लोकांचा शिरस्ताच पडून गेला आहे. एखादा विद्यार्थी अभ्यास न केल्यामुळें नापास झाला तर तो नशिबाला दोष देऊन मोकळा होतो. शहाण्याचें न ऐकतां हट्टानें भलतेंच काम केल्यामुळें आंगावर बाजू आली तरी नशिबालाच बोल. आळसानें काम बिघडलें तरी नशीब जबाबदार. अनुभव नस्तां व्यापार करूं लागल्यामुळें बूड आली तरी नशिबाचेच नांवाची ओरड. जागरण करून, भजीं चिवडा मनमुराद खाऊन किंवा विडी, चहा, ताडी, दारू इत्यादि व्यसनांपायीं शरीराची खराबी करून घेतल्यामुळें दुबळा बनला किंवा आजारी पडला तरी नशिबाच्या नांवानेंच रड. मेहनत न केल्यामुळें शेत पिकलें नाहीं तरी दोष नशिबालाच. एकंदरीनें आपल्या आंगचा उणेपणा, मूर्खपणा, आळस वगैरे सर्व दोषांवर

पांघरूण घालण्यास दैव हें लोकांना एक उत्तम साधन झालें आहे. चांगलें झालें तें मी केलें आणि वाईट झालें तें नशिबानें केलें, असें ह्मणण्याचा सर्वांचा परिपाठच पडला आहे.

हा परिपाठ लोकांच्या इतका आंगवळणी पडून गेला आहे कीं, जरा कांहीं झालें कीं, 'नशीब त्याचें' 'दैव माझें' इत्यादि वाक्यें कानावर पडल्यावांचून दिवस जात नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं, नशीब ह्मणून एक अदृश्य शक्ती असून ती लहरी-प्रमाणें लोकांचें कल्याण करते किंवा नुकसान करते, असा सर्व-साधारण लोकांचा समज झाला असल्यामुळें त्यांची उद्योगप्रीति कमी झाली आहे. कारण उद्योग करून फळ मिळेलच अशी खात्री नसल्यामुळें साहजिकपणेंच उद्योगांत शिथिलता येते; त्याचा परिणाम यश यावयाचें बाजूसच राहून उलट अपयश मात्र पदरीं पडतें. त्यामुळें पुन्हां उद्योगावरील विश्वास अधीकच कमी होऊन नशिबा-वरील श्रद्धा दृढ होते.

याप्रमाणें नशिबावर जसजशी श्रद्धा बसत जाईल तसतशी उद्यो-गांत शिथिलता वाढत जाऊन अधिकाधीक अपयश येत जातें, शेवटीं 'माझें नशीबच वाईट आहे' अशी मनाची भावना होऊन मनुष्य हताश होतो; आणि नशीब अनुकूल नसल्यामुळें प्रत्येक कामांत आपल्याला अपयशच येणार, सर्व प्रकारें आपलें अनहितच होणार, अशी मनुष्याची एकदां दृढ भावना झाली ह्मणजे त्याचा

उत्साह जातो, हिम्मत खचते, बुद्धि मंद होते, आळस वाढतो आणि अखेरीस 'भावना तशीं फळें' असें होऊन तो मनुष्य खरोखरच दुर्दैवी बनतो.

अशा रीतीनें हजारों, लाखों किंबहुना कोट्यावधी लोकांचें नुकसान झालें आहे. याकरतां आपली उन्नती व्हावी अशी इच्छा करणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें 'आपण दैवाधीन आहों' ही गैरसमजूत पहिल्यानें पायांखालीं तुडविली पाहिजे. खरें पाहिलें तर

**१ आपलें दैव आपल्याच हातीं आहे.**

ज्याला ह्मणून थोडा विचार करण्याची शक्ती आहे, ज्याच्या मनाची वाढ खुंटली नाहीं, त्याला 'आपलें दैव आपल्या हातीं आहे' ही गोष्ट पटवून देणें कठीण नाहीं.

विचार करा कीं, 'नशीब ऊर्फ दैव' म्हणजे आहे तरी काय? दैव याचा अर्थ पूर्वसंचीत. 'पूर्वजन्मकृतं कर्म तद्दैवमिति कथ्यते.' पूर्वजन्मीं केलेलें जें कर्म त्याला दैव म्हणतात, आणि या दैवाप्रमाणें म्हणजे आपल्या बऱ्यावाईट कर्माप्रमाणें फळ मिळतें. कर्म चांगलें असेल तर चांगलें फळ मिळतें, कर्म वाईट असेल तर वाईट फळ मिळतें; हा उघडा न्याय आहे.

एकंदरीनें प्रत्येक मनुष्य जसें कर्म करतो तसें त्याचें दैव तयार होतें. सुकर्म केलें तर सुदैव तयार होतें, दुष्कर्म केलें तर दुर्दैव बनतें. आपण सुदैवी व्हावें अशी इच्छा असल्यास चांगलें कर्म

करावें; दुर्दैवी बनण्याची इच्छा असल्यास दुष्कर्म करावें. तात्पर्य आपलें दैव आपल्या हातीं आहे. इंग्रजीमध्येंहि याच अर्थाची एक म्हण आहे. Every man is the architect of his own fortune. ।

आतां यावर कोणी म्हणेल कीं, पूर्वजन्मीचें कर्म या जन्मीं दैव बनून त्याचें फळ या जन्मीं मिळतें, या जन्मीचें फळ पुढील जन्मीं मिळतें, तेव्हां या जन्मी सुदैवी अथवा दुर्दैवी होणें आपल्या हातीं नाहीं. पण ही समजूत साफ चुकीची आहे. गेल्या जन्मीचें कर्म अथवा दैव बरोबर घेऊन मनुष्य जन्मतो हें खरें, परंतु या जन्मीं केलेल्या कर्माचें फळ या जन्मीं न मिळतां पुढच्या जन्मींच मिळतें असें म्हणणें वेडगळपणाचें आहे. शहाणा किंवा विचारी मनुष्य असें कधींच म्हणणार नाहीं. व्यावहारिक दृष्टीचा पाहिलें असतांहि असें म्हणणें सत्याला धरून नाहीं.

कसें तें पहा. आपण या जन्मीं अभ्यास केला असतां याच जन्मीं विद्या येते. या जन्मीं नोकरी केली म्हणजे पगार याच जन्मीं मिळतो, दुसऱ्या जन्मापर्यंत वाट पहावी लागत नाहीं. शेत पेरून जरूर तितकी मेहनत केली असतां याच जन्मी पीक पदरांत पडतें. व्यायाम करून पौष्टिक अन्न खाल्लें असतां याच जन्मीं शरीर बळकट होऊन शक्ती वाढते. निखाऱ्यावर पाय दिला तर याच जन्मीं तत्क्षणीं पायाला चटका बसतो, एखाद्या आपल्यापेक्षां सशक्त मनु-

त्याचे विनाकारण तोंडांत लगावली तर तो लागलीच सव्याज फळ देतो. एखाद्याचा खून केला अथवा चोरी केली तर याच जन्मीं शिक्षा भोगावी लागते. तेव्हां 'या जन्मीच्या कर्माचें फळ या जन्मीं मिळतें' हें उघड आहे.

आतां कधीं कधीं मनुष्य आपण केलेला खून, चोरी वगैरे प्रकारचा गुन्हा युक्तीयुक्तीनें दुसऱ्या कोणास कळूं न देतां 'आजचें मरण उद्यांवर' या ह्मणीप्रमाणें या जन्मीचें प्रायश्चित्त पुढील जन्मावर ढकलतो, हें खरें. आपण मारवाड्याचें काढलेलें कर्ज या वर्षीं न फेडतां कांहीं युक्तीयुक्तीनें पुढील वर्षावर ढकलतों, त्याचप्रमाणें आपलें कांहीं येथेंहि या वर्षीं वसूल न होतां पुढील वर्षाला रहातें, आणि वर्षअखेर या देण्याघेण्याचा आढावा घेऊन आपण पुढील वर्षाचा धंदा करूं लागतों. त्याच न्यायानें गेल्या जन्मीं ज्या दुष्कर्माचें फळ आपण भोगावयाचें टाळलें असेल, किंवा ज्या सुकर्माचें फळ मिळालें नसेल, तेवढेंच आपण आपलें भांडवल ऊर्फ दैव ह्मणून बरोबर घेऊन या जन्मीं संसार करूं लागतों.

मनुष्य कांहींएक न करतां स्वस्थ बसेल तर त्याला आपल्याबरोबर आणलेल्या गेल्याजन्मींच्या पूर्व संचितावर ऊर्फ दैवावरच सर्वस्वी अवलंबून रहावें लागेल, परंतु अगदीं स्वस्थ बसणारा मनुष्य एकही नसतो. प्रत्येक मनुष्य नेहमीं बरें वाईट कर्म करीतच असतो; यामुळें त्यांच्या पूर्व संचितांत ऊर्फ दैवांत भर पडतच असते. वाईट

कर्में जास्त होत जातील तर दुर्दैव वाढत जातें, व सुकर्मे जास्त होतील तर सुदैव वाढत जातें. चांगलीं अगर वाईट कर्मे करणें हें प्रत्येक मनुष्याचे हातीं असल्यामुळें आपलें सुदैव अगर दुर्दैव वाढवणें आपले हातीं आहे यांत संशय नाहीं.

तेव्हां आपला भाग्योदय व्हावा असें इच्छिणाऱ्या तरुणानों ! दुर्दैवापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं या वेडगळ समजुतीला गाडून टाकून उद्योगाचे बळावर दुर्दैवाचा नायनाट करून दैववान् बनण्याचा निश्चय करा. 'निश्चयाचें बळ। तुका ह्मणे तेंचि फळ॥' ह्मणजे या न्यायानें तुह्मीं दैववान् बनून तुमचा भाग्योदय झाल्यावांचून रहाणार नाहीं.

# कल्पवृक्ष.

—०—

कल्पवृक्ष ह्मणजे मनांत जी कल्पना करावी तें फळ देणारें झाड. हें झाड जगांत आहे कीं नाहीं परमेश्वर जाणे. मनुष्यांना तरी या झाडाचा अद्याप पर्यंत पत्ता लागलेला नाहीं. तथापि कल्पवृक्ष ही उपमा उद्योगाला लावली तर ती उत्तम साजते, यांत शंका नाहीं.

उद्योगानें साध्य होत नाहीं, अशी जगांत वस्तु नाहीं. कल्पनेसहि असाध्य वाटणाऱ्या गोष्टी उद्योगानें साध्य होतात. कांहीं वर्षांमागें घोड्यावांचून गाडी चालवतां येईल ही कल्पना अशक्य वाटत होती; परंतु ती आज शक्य झाली आहे, हें पों, पों, पों, करीत धांवणारी मोटार आपले कानीं कपाळीं ओरडून सांगत असते. तारेवांचून तार पाठवण्याची कल्पना शक्य झाली आहे. मुंबईहून पुण्याचे मनुष्याजवळ पांच मिनिटें बोलत किंवा गप्पा सांगत बसतां येतें, ही गोष्ट मुंबई व पुणें यांमध्यें टेलिफोन सुरू झालेला आहे, हें ज्यांस माहीत आहे त्यांस सांगावयास नकोच. मनुष्यास आतां आकाशांतून पक्षाप्रमाणें अर्थात् विमानांतून संचार करतां येतो. मोटारीप्रमाणें पाहिजे त्याला आतां लहान लहान विमानें गाडीप्रमाणें किंवा मोटारप्रमाणें घरीं ठेवतां येऊं लागलीं आहेत. आणखी काय काय चमत्कार मनुष्याला उद्योगाचे बळावर साध्य करतां येतील याची कल्पना करतां येत नाहीं. जी जी कल्पना मनुष्याचे मनांत येते ती ती उद्यो-

गानें आज नाहीं उद्यां, या पिढीला नाहीं तर पुढल्या पिढीला केव्हांना केव्हांतरी साध्य होतेच असा आजपर्यंतचा अनुभव आहे. तेव्हां उद्योगाला कल्पवृक्ष ही उपमा खरोखरच उत्तम साजते.

पूर्वींपासून आपल्या देशांत उद्योगाचें महत्व फार मानलें आहे. यामुळेंच ' उद्योगिनःकरालम्बं करोति कमलालया। अनुद्योगि करालम्बं करोति कमलाग्रजा ॥ ' ह्मणजे उद्योग्याला लक्ष्मी वरते आणि निरुद्योग्याला आकाबाई माळ घालते. त्याचप्रमाणें ' उद्योग्याचे घरीं । ऋद्धि सिद्धी पाणी भरी ' या ह्मणी प्रचारांत आल्या आहेत.

उद्योगाचें फळ प्रत्यहीं मिळत असतां कांहीं लोकांची उद्योगापेक्षा नशिबावरच अधिक श्रद्धा असते ती कितपत योग्य आहे, याचा आपण विचार करूं.

उद्योगाला मुळींच महत्व न देतां केवळ दैवावर भरंवसा ठेवणारा मनुष्य या जगांत असेल असें वाटत नाहीं; आणि कदाचित् एखादा हटवादी तोंडानें तसें ह्मणत असला तरी त्याची खरीखरी समजूत तशी नसते हें दाखवतां येईल. अशा पूर्ण दैववादी ऊर्फ हटवादी गृहस्थाला विचारावें कीं, तूं घराला कुलूप कडी कशाला लावतोस ? तुझ्या घरांतील चीजवस्तू कोणी चोरून नेणार नाहीं. कारण ती तुझ्या दैवांत आहे. ती तुला मिळालीच पाहिजे. ती न्यावी अशी बुद्धि कोणाला होणारच नाहीं; कदाचित् झालीच तरी तुझें दैव मध्यें आडवें येऊन ती कोणाला नेऊं देणार नाहीं. नेणाराला शिपाई

धरील किंवा मागाहून तो पकडला जाऊन तुझी चीजवस्तू तुला परत मिळेल. किंवा तुझ्या नशिबांतच नसली तर तूं कुलूप लावूनहि ती राहणार नाहीं. ती कोणत्याना कोणत्या तरी मार्गानें नाहींशी होईल. त्याचप्रमाणें त्याला विचारावें कीं, तूं बाजारांत जाऊन सामानसुमान कशाला आणतोस ! तुझ्या नशिबीं भोजन मिळावयाचें असेल तर तें आपोआप तुझ्यापुढें चालत येईल. नसेल मिळावयाचें तर सामान आणलेंस, मेहनत केलीस तरी भोजन मिळणार नाहीं, मग तूं बाजारांत जावयाचा त्रास तरी कशाला घेतोस ! तुझे ते पैसे माझेजवळ दे. मी त्यांचा बाजारांत जाऊन मला हवा तो उपयोग करून घेतों. घाबरूं नकोस, तुझे पैसे कोठें जाणार नाहींत. ते तुझ्या नशिबाचे आहेत आपोआप तुझ्याकडे येतील. आणि हे तुझ्या आंगावरचे कपडेहि पण मला दे. ते तुझ्या नशिबीं नसले तर कोणत्या ना कोणत्या रूपाने तरी दैव घेऊन जाणारच ते मीच नेतों. बरें तुझ्या नशिबीं असले तर दैव आपोआप आणून देईल. हा सरळ न्याय त्याला पटणार नाहीं [illegible] तो आपला पैसा व कपडे देणार नाहीं. मग त्याला सांगा तूं उद्यो[illegible]च्या विरुद्ध आहेस, तूं उचलून देण्याचा तरी उद्योग काय ह्मणून करशील ! मी आपला उद्योगवादी आहें. मीच तुझा पैसा व कपडे घेण्याचा उद्योग करतों. तूं आपल्या मताप्रमाणें नशिबावर पूर्ण हवाला ठेवून स्वस्थ बसून रहा. ' असें ह्मणून तुह्मीं त्याचे कपडे व पैसे घेऊं लागलांत कीं हा गृहस्थ एकदम उद्योगवादी बनून ' आपले

पैसे व कपडे जाऊं नयेत ' ह्मणून शक्य तो उद्योग करूं लागेल. जरूर तर पोलिस स्टेशनचाहि रस्ता धरील. मात्र तोंडानें दैववादाचीच तरफदारी करील, व ' माझ्या दैवांत तसेंच लिहिलेलें असेल ' असें ह्मणेल.

हीं माणसें निवळ हटवादी. दैववादी नव्हत. निवळ दैवावर भरंवसा ठेवून मुळींच उद्योग न करणारा मनुष्य जगांत नाहीं; व असा मनुष्य जगांत जगणेंहि शक्य नाहीं. सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेतलेला संन्यासीहि पोटाची व्यवस्था पहातच असतो, क्रूर श्वापदांपासून रक्षण होण्याकरतां गुहेचा आश्रय करतो, व थंडीचे निवारणाकरतां धुमी पेटवतो आणि मोक्षप्राप्तीकरितांहि उद्योग करीतच असतो; म्हणजे त्याची उद्योगावर श्रद्धा असतेच.

साधारण व्यवहारामध्यें दैववादी म्हणून जे लोक असतात त्यांचा दैवावरहि पूर्ण भरंवसा नसतो आणि उद्योगावरहि पूर्ण भरंवसा नसतो. ' दैव पंगू आहे, उद्योगाचे मदतीवांचून तें फळास येत नाहीं; त्याचप्रमाणें दैवाचे अनुकूलतेवांचूनहि उद्योगाचें फळ मिळत नाहीं; ' अशी त्यांची समजूत असते.

या ठिकाणीं पहिल्यानें ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, दैव म्हणजे पूर्वसुकृत-अर्थात् पूर्वजन्मीं फळ भोगावयाचें राहिलेलें कर्म. कर्म उद्योगावांचून होत नाहीं; तव्हां दैव म्हणजे फळ न मिळतां शिल्लक राहिलेला उद्योग हें उघड झालें, आणि या करितांच दैव म्हणून जो

बागुलबुवा लोकांनीं आपल्या कल्पनेनें बनवला आहे त्याला भिण्याचें मुळींच कारण नाहीं.

आतां 'दैव पंगू आहे, उद्योगाचे मदतीवांचून तें फळास येत नाहीं,' ही गोष्ट खरी आहे. आपण आतांच पाहिलें कीं, दैव म्हणजे फळ न मिळतां शिल्लक राहिलेलें कर्म. फळ मिळण्यास कांहींतरी अडचणी असल्यामुळेंच कर्म दैवरूपानें शिल्लक राहिलें हें उघड आहे. त्या अडचणी दूर केल्यावांचून म्हणजे उद्योग केल्यावांचून त्या राहिलेल्या कर्माचें ऊर्फ दैवाचें फळ कसें मिळेल! तेव्हां 'दैव पंगू आहे, उद्योगाचे मदतीवांचून तें फळास येत नाहीं' ही गोष्ट सरळच आहे.

तथापि 'दैवाचे अनुकूलतेवांचून उद्योगाचें फळ मिळत नाहीं' ही निवळ गैरसमजूत आहे. दैव ह्मणजे पूर्वकर्म अनुकूल असेल तर चालू उद्योगाचें फळ भरपूर मिळेल ही गोष्ट खरी, परंतु तें प्रतिकूल असेल तर चालू उद्योगाचें फळ मुळींच मिळणार नाहीं हें ह्मणणें अविचाराचें आहे. उद्योगाचें ऊर्फ कर्माचें फळ मिळालेंच पाहिजे असें आपलें धर्मशास्त्र सांगतें आणि व्यावहारिक दृष्ट्याहि तें अनुभवानें खरें ठरतें.

'मी उद्योग केला, पण त्याचें फळ मिळालें नाहीं.' असें मनुष्य ह्मणतो त्यावेळीं त्याचे बोलण्याचा खरा अर्थ 'माझ्या इच्छेप्रमाणें किंवा अंदाजाप्रमाणें फळ मिळालें नाहीं' असाच असतो. 'मला

मुळींच फळ मिळालें नाहीं' असें ह्मणण्याचा त्याचा हेतूच नसतो. उदाहरणार्थ—एखादा मुलगा अभ्यास करून नापास झाला ह्मणजे तो ह्मणतो 'मी उद्योग केला पण दुर्दैवानें नापास झालों. माझ्या उद्योगाचें फळ मला मिळालें नाहीं.'

वास्तवीक तो मुलगा नापास झाला, ह्मणजे काय झालें. त्याला सर्व विषयांत शेंकडा तेतिसांपेक्षां जास्त मार्क मिळावयास पाहिजे होते ते कांहीं विषयांत कमी मिळाले; परंतु अभ्यासाचें फळ ज्ञान वाढणें, तें त्याला मुळींच मिळालें नाहीं असें कोण ह्मणेल ? अर्थात् त्याचें ज्ञान वाढलें ह्मणजे त्याच्या उद्योगाचें त्याला फळ मिळालें. मात्र तें त्याला हवें होतें त्यापेक्षां कमी प्रमाणांत मिळालें. तें कमी मिळण्यास अनेक कारणें असूं शकतील. त्याचा एखादा विषय पहिल्यापासून कच्चा असेल, किंवा त्यानें त्या विषयाचा करावा तितका अभ्यास केला नसेल, एखाद्या विषयांत त्याची बुद्धि बरोबर चालत नसेल, अथवा शिकवणारा मास्तर वाईट असेल, त्याला त्या विषयाच्या तासांना हजर रहातां आलें नसेल, वगैरे अनेक कारणें असूं शकतील; परंतु त्यावरून उद्योगाचें फळ मिळत नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं. उलट त्याला कांहींतरी मार्क मिळाले, त्याचें कांहींतरी ज्ञान वाढलें ह्मणजे त्याला उद्योगाचें फळ मिळालें असेंच सिद्ध होतें.

तरीपण सारख्या उद्योगाचें फळ सर्वांना सारखें मिळत नाहीं हें खरें. एक मुलगा रोज चार तास अभ्यास करून पहिला नंबर पट-

कावतो व दुसरा तितकाच अभ्यास करून मध्यम ठरतो तर तिसरा जेमतेम पास होतो. याला बुद्धिमांद्य, कच्चे विषय, अशक्तपणा वगैरे कारणें असतात; तेव्हां उद्योगाचें फळ मिळतें पण परिस्थितीभेदानें तें कमीजास्ती मिळतें; आणि हें असें होतें हें सृष्टीनियमाला धरूनच आहे. उदाहरणार्थ एखाद्या सुपीक जमिनींत एक मण गहूं पेरून साधारण मेहनत केली असतां जितकें पीक येईल, तितकें नापीक जमिनींत येणार नाहीं. आणि एखाद्यानें खडकावर गहूं पेरण्याचा मूर्खपणा केला तर मुळींच पीक न येतां उलट बीं मात्र फुकट जाईल. तेव्हां उद्योगाचें फळ मिळतें, पण त्याचे जोडीला बुद्धि, अनुभव, वगैरे गुणांची व अनुकूल परिस्थितीची जरूर असते हें विसरतां कामा नये.

परिस्थिती अनुकूल असेल तर थोड्या श्रमांत ह्मणजे थोड्या उद्योगानें पुष्कळ फळ मिळतें आणि परिस्थिती प्रतिकूल असेल तर तितकेंच फळ मिळण्यास त्या मानानें जास्त उद्योग करावा लागतो. उदाहरणार्थ आपली जमीन सुपीक आहे, पाणी पाटाचें विपुल आहे, पेरण्यास धान्य चांगलें आहे ह्मणजे एकंदर परिस्थिती अनुकूल आहे तर आपल्याला कमी श्रमांत भरपूर पीक मिळेल. पण उलटपक्षीं जमीन सुपीक नसेल, तर तींत खत घालावें लागेल, धान्य चांगलें नसेल तर निवडून चांगलें काढावें लागेल, पाणी नसेल तर विहीर खणावी लागेल, मोटेनें पाणी काढावें लागेल; एकंदरींत परिस्थिति ज्या मानानें ज्यास्त प्रतिकूल त्या मानानें, फळ मिळण्यास जास्त

उद्योग करावा लागेल; तेव्हां उद्योगाचें फळ मिळतें हा सिद्धांत अधीकच दृढ झाला यांत संशय नाहीं.

शिवाय मनुष्यानें उद्योग करावा अशीच परमेश्वराची योजना दिसते, व आजपर्यंत मनुष्यानें आपल्या सुखसोयी व ज्ञान वाढवलें तेंहि उद्योगाचे बळावरच असें दिसून येतें. मनुष्याला निर्वाहाकरतां लागणारे सर्व पदार्थ उद्योग करून मिळवावे लागतात. धान्य पिकवावें लागतें, जंगलांतील लांकडें तोडून आणून सर्पण करावें लागतें, कापसाचीं वस्त्रें विणावीं लागतात; सोनें, लोखंड, खाणींतून काढून शुद्ध करावें लागतें; प्रत्येक पदार्थ उद्योगानेंच मनुष्याला प्राप्त करून घ्यावा लागतो. आपोआप कांहींएक मिळत नाहीं. पशुपक्ष्यांना देखील अन्नपाण्याकरतां उद्योग करावाच लागतो. तथापि मनुष्याला आपल्या बुद्धिबलाच्या योगानें उद्योगाचें फळ पशुपक्ष्यांच्या शतपटीनें, सहस्रपटीनें मिळवितां येतें. मात्र मनुष्याला उद्योगहि तसाच जबर करावा लागतो. सुवेझचा कालवा खणून आशिया व आफ्रिकाखंड अलग करून यूरोपांतुन हिंदुस्थानांत येण्यास जवळचा रस्ता करण्याकरतां किती अचाट उद्योग करावा लागला, किती अडचणींना तोंड द्यावें लागलें ? पानामाची संयोगभूमि खणून अमेरिका खंडाचीं दोन शकलें करून अतलांतिक महासागराला पासिफिक महासागर जोडण्यास किती जबरदस्त उद्योग करावा लागला. एकंदरींत मनुष्य जी जी कल्पना मनांत आणील ती ती त्याला साध्य करतां येते, मात्र काम

कावतो व दुसरा तितकाच अभ्यास करून मध्यम ठरतो तर तिसरा जेमतेम पास होतो. याला बुद्धिमांद्य, कच्चे विषय, अशक्तपणा वगैरे कारणें असतात; तेव्हां उद्योगाचें फळ मिळतें पण परिस्थितीभेदानें तें कमीजास्ती मिळतें; आणि हें असें होतें हें सृष्टीनियमाला धरूनच आहे. उदाहरणार्थ एखाद्या सुपीक जमिनींत एक मण गहूं पेरून साधारण मेहनत केली असतां जितकें पीक येईल, तितकें नापीक जमिनींत येणार नाहीं. आणि एखाद्यानें खडकावर गहूं पेरण्याचा मूर्खपणा केला तर मुळींच पीक न येतां उलट बीं मात्र फुकट जाईल. तेव्हां उद्योगाचें फळ मिळतें, पण त्याचे जोडीला बुद्धि, अनुभव, वगैरे गुणांची व अनुकूल परिस्थितीची जरूर असते हें विसरतां कामा नये.

परिस्थिती अनुकूल असेल तर थोड्या श्रमांत ह्मणजे थोड्या उद्योगानें पुष्कळ फळ मिळतें आणि परिस्थिती प्रतिकूल असेल तर तितकेंच फळ मिळण्यास त्या मानानें जास्त उद्योग करावा लागतो. उदाहरणार्थ आपली जमीन सुपीक आहे, पाणी पाटाचें विपुल आहे, पेरण्यास धान्य चांगलें आहे ह्मणजे एकंदर परिस्थिती अनुकूल आहे तर आपल्याला कमी श्रमांत भरपूर पीक मिळेल. पण उलटपक्षीं जमीन सुपीक नसेल, तर तींत खत घालावें लागेल, धान्य चांगलें नसेल तर निवडून चांगलें काढावें लागेल, पाणी नसेल तर विहीर खणावी लागेल, मोटेनें पाणी काढावें लागेल; एकंदरींत परिस्थिती ज्या मानानें ज्यास्त प्रतिकूल त्या मानानें, फळ मिळण्यास जास्त

उद्योग करावा लागेल; तेव्हां उद्योगाचें फळ मिळतें हा सिद्धांत अधीकच दृढ झाला यांत संशय नाहीं.

शिवाय मनुष्यानें उद्योग करावा अशीच परमेश्वराची योजना दिसते, व आजपर्यंत मनुष्यानें आपल्या सुखसोयी व ज्ञान वाढवलें तेंहि उद्योगाचे बळावरच असें दिसून येतें. मनुष्याला निर्वाहाकरतां लागणारे सर्व पदार्थ उद्योग करून मिळवावे लागतात. धान्य पिकवावें लागतें, जंगलांतील लांकडें तोडून आणून सर्पण करावें लागतें, कापसाचीं वस्त्रें विणावीं लागतात; सोनें, लोखंड, खाणींतून काढून शुद्ध करावें लागतें; प्रत्येक पदार्थ उद्योगानेंच मनुष्याला प्राप्त करून घ्यावा लागतो. आपोआप कांहींएक मिळत नाहीं. पशुपक्ष्यांना देखील अन्नपाण्याकरतां उद्योग करावाच लागतो. तथापि मनुष्याला आपल्या बुद्धिबलाच्या योगानें उद्योगाचें फळ पशुपक्ष्यांच्या शतपटीनें, सहस्त्रपटीनें मिळवितां येतें. मात्र मनुष्याला उद्योगहि तसाच जबर करावा लागतो. सुवेझचा कालवा खणून आशिया व आफ्रिकाखंड अलग करून यूरोपांतुन हिंदुस्थानांत येण्यास जवळचा रस्ता करण्याकरतां किती अचाट उद्योग करावा लागला, किती अडचणींना तोंड द्यावें लागलें ? पानामाची संयोगीभूमी खणून अमेरिका खंडाचीं दोन शकलें करून अतलांतिक महासागराला पासिफिक महासागर जोडण्यास किती जबरदस्त उद्योग करावा लागला . एकंदरींत मनुष्य जी जी कल्पना मनांत आणील ती ती त्याला साध्य करतां येते, मात्र काम

ज्या मानानें मोठें व अवघड त्या मानानें उद्योग अधीक करावा लागतो.

तात्पर्य मनुष्याला उद्योगानें हवें तें करतां येतें. अशक्य वाटणाऱ्या गोष्टीहि शक्य करतां येतात. 'असाध्य तें साध्य करीतां सायास' उद्योगानें असाध्य गोष्टीहि साध्य करतां येतात. मग जें दुसऱ्या लोकांनीं केलें, जें साध्य होण्यासारखें आहे, तें उद्योगानें आपल्याला साध्य करतां येईल यांत संशयच नाहीं.

तरुणानों! कित्येक लोक गरिबाचे श्रीमंत झाले आहेत. या मुंबई शहरांत आज जे लक्षाधीश व कोट्याधीश आहेत, ते कांहीं आपल्या घरून पैसे घेऊन येथें आले नाहींत. हे किंवा यांचे वडील, फार झालें तर यांचे आजे, या मुंबई शहरांत अगदीं गरीब स्थितींत पाऊल टाकून दुसऱ्याकडे नोकरीला राहिले होते, पुढें ते श्रीमंत होऊन ऐषआराम भोगूं लागले; पण पहिल्यानें गरिबींतून वर डोकें काढून श्रीमंत होण्यास त्यांना अत्यंत श्रम करावे लागले आहेत हें विसरूं नका; ते उद्योगाचे बळावरच गरिबाचे श्रीमंत झाले आहेत हेंहि विसरूं नका.

आपला भाग्योदय करूं इच्छिणाऱ्या तरुणानों! उद्योगाचे बळावर पुष्कळ लोक गरिबाचे श्रीमंत झाले आहेत. त्याचप्रमाणें यूरोप अमेरिकेंत मजुरांचीं मुलें मजुरी करून पोट भरीत असतां घरीं अभ्यास करून, किंवा उत्तम ग्रंथांचें वाचन चालू ठेवन विद्वान् होऊन मुत्सद्दी म्हणून गाजत आहेत.

महाराष्ट्रीय तरुणानों ! यूरोपांतील मजुरांच्या मुलांपेक्षांहि तुह्मी कमी प्रतीचे अहां काय ! खात्रीनें नाहीं !! गरिबांच्या मुलानों ! पाणीदार तरुणानों ! योग्य मार्गानें उद्योग करा; नेटानें उद्योग करा, ह्मणजे श्रीमंत व्हाल, विद्वान् व्हाल आणि तुमचा भाग्योदय होईल. )

ग्रंथालय ठाणे

# काय करूं ? कोणता धंदा करूं !

आपण कोणता धंदा करावा, किंवा आपल्या भावाला, भाच्याला, मुलाला, अथवा नातवाला कोणत्या धंद्यांत घालावा, हा प्रश्न प्रत्येक मनुष्यापुढें केव्हांना केव्हांतरी आल्यावांचून रहात नाहीं.

|वास्तविक हा प्रश्न फार महत्वाचा आहे. धंद्याची निवड करण्यांत चूक झाली तर ती मागाहून सुधारणें कठीण पडतें, आणि ती सुधारली गेली नाहीं तर पुन्हां भरून न येण्याइतकें नुकसान होतें, किंबहुना आपल्या आंगच्या गुणाचें मातेरें होऊन जन्माचें नुकसान होतें. याकरतां या प्रश्नाचा प्रत्येक मनुष्यानें नीट विचार करणें अगत्याचें आहे. निदान् महत्वाकांक्षी तरुणानीं तरी या प्रश्नाचा अवश्य विचार करावा./

'मी काय करूं ? कोणता धंदा पतकरूं ?' असा कोणी प्रश्न केला असतां त्याला आपण 'वकिली, डाक्टरी, मुन्सफी, मामलेदारी उत्तम. नाहींतर सेक्रेटरीएट, शाळाखातें, पोष्टखातें आहेच. होतां होईतों सरकारी पेन्शनेबल नोकरी धर' असें उत्तर देतों. परंतु 'मी काय करूं' या प्रश्नाचें हें समर्पक उत्तर नव्हे. विचारणाराचा उद्देश 'कोणत्या धंद्यांत मला यश येईल, ह्मणजे नांवलौकिक होऊन पैसे भरपूर मिळतील.' हें समजावें असा असतो. हा उद्देश लक्षांत घेऊन या प्रश्नाचें उत्तर देणें असेल तर बऱ्याच गोष्टींचा नीट विचार करून उत्तर दिलें पाहिजे.

एखादा वैद्य किंवा डाक्टर रोग्याची प्रकृती, परिस्थिती, पूर्व-चरित्र, शक्ति, मनस्थिती वगैरे सर्व गोष्टी लक्षांत घेऊन औषध-योजना करतो; वसंत, ताम्रभस्म, लोह, वगैरे दहापांच उत्तम औष-धांचीं नांवें घेऊन यांतून एक घे असें सांगत नाहीं. त्याचप्रमाणें ' धंदा कोणता करूं ' या प्रश्नाचें उत्तर देतांनाहि दहापांच धंद्यांचीं नांवें सांगून मोकळें होतां कामा नये. सर्वच धंदे सर्वांना होण्यासारखे नसतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

उदाहरणार्थ--वकिलीचा धंदा एखादा सरळ स्वभावाच्या, सन्मार्गी, पापभीरु, समतोल व शांतवृत्तीच्या मनुष्याला साधणार नाहीं. असा मनुष्य जज्जाचें काम उत्तम करील. पण तो वकिली करूं लागेल तर त्याला मानसिक त्रास होऊन सांपत्तिक फायदाहि होणार नाहीं. तो अगदीं गचाळ वकील ठरेल. कारण वकिलाला आपलें मत बाजूस ठेवून साक्षीदार पढवावे लागतात, पळवाट काढावी लागते, उसनें अवसान आणून खोटी बाजू खरी आहे ह्मणून ठासून सांगावें लागतें, आणि आपले मनाविरुद्ध, मताविरुद्ध व सत्यधर्माविरुद्ध कितीतरी गोष्टी कराव्या लागतात. शिवाय वकील समयसूचक, कोटिबाज, चाणाक्ष व विवादकुशल असावा लागतो; तेव्हां हे गुण अंगीं नस-लेला मनुष्य वकिली करूं लागेल तर त्याचा त्या धंद्यांत भाग्योदय कसा होणार ?

ज्याचे आंगीं मनुष्याची पारख, व्यवहारज्ञान, दूरदर्शीपणा, धाडस,

धैर्य, चिकाटी वगैरे गुण नाहींत त्यानें व्यापारांत पडण्यांत काय होशील ? ज्याला डावपेंच कळत नाहींत, आंगीं कर्तृत्वशक्ती नाहीं, वक्तृत्व नाहीं, दूरदर्शीपणा नाहीं, लोकांवर छाप पाडण्याची कला अवगत नाहीं, प्रतिपक्षाशीं दोन हात करण्याची धमक नाहीं, राजकारणाचा अभ्यास नाहीं, आणि ज्याला अडचणींतून निसटून जाण्यास युक्ती सुचत नाहीं, तो मुत्सद्दी कसा होणार ?

ज्याला दुसऱ्याचा शब्द सोसवत नाहीं, हांजी हांजी करवत नाहीं, वरिष्ठाचा स्तुतिपाठ गातां येत नाहीं, अपमान सोसून उलट ही ही करतां येत नाहीं, वरिष्ठाचा कल पाहून वागतां येत नाहीं, आपला अपराध नसतांहि शिव्या खाऊन 'माफ करा साहेब' असें ह्मणवत नाहीं, आणि आपण लांच खाऊन वरिष्ठांस पोंचवतां येत नाहीं, त्याची नोकरींत बढती कशी होणार !

ज्याला भटकण्याची हौस, खुर्चीवर बसून रहाणें शिक्षेसारखें वाटतें, याची ओळख काढ, त्याचेजवळ स्नेह जोड, एका जवळून काम करून घे, दुसऱ्याचा वशिला तिसऱ्याला लाव, असा ज्याचा स्वभाव, त्याला बैठी नोकरी काय कामाची. माल विकणें, शेअर खपवणें, बाहेरगांवीं फिरून आपले कंपनीला माल व गिऱ्हाईक मिळविणें हीं कामें त्याला उत्तम साधतील.

तात्पर्य, मनुष्याचा स्वभाव, त्याच्या आंगचे गुण, त्याची आवड, त्याची बुद्धि, त्याची शक्ती, त्याची परिस्थिती, त्याचे स्नेही सोबती

व नातलगांची मदत वगैरे अनेक गोष्टींचा नीट विचार करून मग धंदा किंवा नोकरी काय करावयाची हें ठरवलें पाहिजे./

हल्लीं या बाबतींत अत्यंत दुर्लक्ष होत आहे. यामुळें बुद्धिवान्, कर्तृत्ववान्, प्रामाणिक व गुणी मनुष्यें रखडत पडलीं आहेत. त्यांची भरभराट व्हावयाची तें बाजूसच राहून उलट ते पोटाला महाग झाले आहेत. कांहीं बुद्धिमान तरुण परिक्षेंत नंबर वर पटकावतात, बक्षिसें मिळवतात, आणि पुढें स्वतंत्र व मानाचा धंदा ह्मणून वकिलीचा धंदा पतकरतात; पण वकिलीस लागणारे गुण आंगीं नसल्यामुळें, हे बुद्धिवान्, प्रामाणिक व मेहनती तरुण वकिलींत नालायक ठरतात. स्वतंत्रतेच्या लोभानें आपल्या आंगीं वकिलीला जरूर असलेले गुण आहेत कीं नाहींत याचा विचार न करतां वकिली पतकरल्यामुळें ज्यांनीं आपल्या जन्माचें मातेरें करून घेतलें आहे असे कांहीं वकील प्रत्येक तालुकाकोर्टांत, जिल्हाकोर्टांत व हायकोर्टांतहि नजरेस पडतात.

इतर धंद्यांतूनहि हीच स्थिती आहे. आमचे पहाण्यांत एक डाक्टर आहे; तो काळजीनें रोगी तपासतो, स्वभावानें चांगला आहे, नेहमीं पुस्तकें वाचून आपलें ज्ञान वाढवीत असतो. पण तो भित्रा आहे. साधारण किरकोळ आजाराचे रोगी तो चटकन् बरे करतो, पण बराच आजारी पडलेला रोगी त्याचे हातून सहसा बरा होत नाहीं. तो स्वतःच घाबरून जाऊन हें औषध देऊं कीं तें देऊं, औषध जास्त तर होणार नाहींना, वगैरे शंका कुशंकांमुळें औषधें बदलतां

बदलतांच रोगी दगावतो. मुख्य गोष्ट, डाक्टरी करण्यास हवे ते गुण त्याचे आंगीं नाहींत यामुळें त्याला पैसा मिळत नाहीं व रोग्याचेंहि नुकसान होतें.

दुसरा एक बुद्धिवान् व पढिक वैद्य आमचे पहाण्यांत आहे. हा गृहस्थ निरलस, उद्योगी, प्रामाणिक, परोपकारी, काळजीपूर्वक काम करणारा पण भित्र्या स्वभावाचा व चंचलवृत्तीचा आहे. यामुळें त्याला धंद्यांत यश नाहीं. त्यानें भलताच धंदा पतकरल्यामुळें हा बुद्धिमान, उद्योगी, प्रामाणिक व सज्जन गृहस्थ रखडत पडला असून त्याला आपल्या कुटुंबाचें पोषण करणेंहि जड झालें आहे.

त्याचप्रमाणें कांहीं बी. ए. एम. ए. गृहस्थ आहेत. फार हुषार ह्मणून नांवाजलेले विद्वान; पण शिकवतां मुळींच येत नाहीं, आणि धंदा पतकरला मास्तरी किंवा प्रोफेसरीचा. शिकवतां चांगलें येत नाहीं यामुळें दुर्लौकिक, बढतीची आशा नाहीं आणि विद्यार्थ्यांचें नुकसान. हे चांगले शिकलेले; पण धंदा पतकरण्यापूर्वी या पढतमूर्खांनीं कांहींच विचार केला नाहीं.

दुसरे कांहीं मास्तर फारसे शिकलेले नसतात पण शिकवितात उत्तम. त्यांचा तो स्वभावगुणच असतो. अशा मास्तरांचे हाताखालीं शिकण्यास मुलांना हौस वाटते. अशा मास्तरांचे हाताखालीं मंदबुद्धि, उनाड व आळशी मुलांचीहि पास होण्यापुरती तयारी होते. ज्यांना शिकवतां येत नाहीं ते मास्तरकीपासून दूर रहाण्याची मेहरबानी करतील तर त्यांचा फायदाच होईल, आणि शिवाय मुलांचेंहि कल्याण

होईल. पण धंदा पतकरतांना विचार करण्याची मुळीं आम्हाला संवयच नाहीं. सामान्य लोकांप्रमाणेंच सुशिक्षित लोकहि 'पुढच्या मागून मागचा' या म्हणीप्रमाणें मेंढरांसारखे जातात. सुशिक्षितानों ! तुम्ही कदाचित चुकलां असलां तरी तीच चूक आपल्या मुलांचे हातून होऊं देऊं नका.

धंद्याची निवड करतांना दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, ज्या धंद्यामुळें शरीरावर वाईट परिणाम घडतो तो धंदा होतां होईतों पतकरूं नये. गिरणींत किंवा अशाच तऱ्हेच्या कोंडलेल्या हवेंत काम करणें अपायकारक असतें. ज्या जागीं पुष्कळ माणसें एकत्र काम करीत असतात तेथील हवा अपायकारक असते. लोखंड किंवा इतर धातू कांतण्याचें काम फार वाईट. धातूचा कीस हवेबरोबर फुप्फुसांत गेल्यानें क्षयासारखे रोग होण्याचा फार संभव असतो. कोळशाच्या वगैरे खाणींतून काम करणेंहि आरोग्याचे दृष्टीनें हानिकारकच आहे. आसिडें उर्फ तेजाप तेलांचे कारखान्यांत काम करणेंहि अपायकारकच असतें.

आरोग्याचे दृष्टीनें शेतीचा धंदा सर्वांत उत्तम. शेती करणारे लोक जितके अधीक जगतात तितके दुसऱ्या कोणत्याहि धंद्यांतील लोक जगत नाहींत. आमचे सुशिक्षित लोक शेती करूं लागतील आणि नवीन तऱ्हेचीं खतें, आऊतें व बीं वापरून, शेतींत सुधारणा करण्याकडे लक्ष घालतील तर त्यांचें आरोग्य वाढेल, ते दीर्घायुषी होतील, त्यांना भरपूर पैसा मिळेल आणि देशाचाहि फायदा होईल.

यापुढें आमचे सुशिक्षितांनीं शेतीकडे दुर्लक्ष केल्यास परकी लोक येथें येऊन कंपन्या काढून शेती बळकावून बसतील; मग आह्मांला त्यांचेबरोबर चढाओढ करणें अशक्य होऊन, परकीयांचे मालकीचे शेतांत मजुरांवर मुकादमी करण्याचें काम आमच्या सुशिक्षितांचे वांट्यास येईल. तरी ज्यांस शेतीची आवड असेल, स्वतःच्या निर्वाहापुरती ज्यांची जमीन असेल, व जवळ थोडासा पैसा असेल त्यानीं बी. ए. होण्याचे भरीस न पडतां सात इयत्तापर्यंत इंग्रजी शिकून शेतीकडे लक्ष घालावें.

बागायती शेतीला सहसा बूड नाहीं; ह्मणून फळें, फुलें, भाजीपाला वगैरे पिकें काढण्यास पहिल्यानें सुरुवात करून आस्ते आस्ते मोठी शेती करावी. यूरोप अमेरिकेंत विश्वविद्यालयाच्या परिक्षा पास झालेले किती तरी लोक स्वतः शेती करतात, व दुसऱ्यांचीं शेतें मक्त्यानें घेऊन त्यांत वर्षाकाठीं दहावीस हजार रुपये मिळवतात. स्वतःचीं भरपूर शेती असलेले सुशिक्षित शेतकरी तर लाखों रुपये मिळवतात. पण आमच्या सुशिक्षितांस शेती करणें कमीपणाचें वाटतें व नोकरी ऊर्फ गुलामगिरी करणें मानाचें वाटतें याला काय ह्मणावें.

शेती करणाराला शुद्ध हवा, निर्मळ पाणी, ताजा भाजीपाला, निर्भेळ दूध, तूप व उत्तम अन्न मिळतें; आणि शारिरीक व्यायाम सहजासहजीं घडतो. हींच आरोग्याचीं, सुखाचीं व दीर्घायुषी होण्याचीं मुख्य साधनें आहेत. एकंदरींत '**उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी**' ही ह्मण सर्वस्वी खरी आहे.

# व्यापारे वसती लक्ष्मी.

शेतीच्या खालोखाल व्यापार. व्यापारांत जितका भरपूर पैसा मिळण्याचा संभव असतो तितका शेतींत नसतो; परंतु आरोग्याचे दृष्टीनें व्यापाराचा नंबर शेतीचे खालीं लागतो. नेहमीं दगदग, काळजी, जरूरीचे कामांमुळें खाण्यापिण्यांत अनियमितपणा, शहरची कोंदट हवा, निःसत्व पाणी वगैरे गोष्टी व्यापाऱ्याचे आरोग्याची हानी करतात.

धंदा आरोग्यदायक असावा, त्याचप्रमाणें तो प्रामाणिक असावा. त्यांत असत्य भाषण, लबाडी, फसवणूक व छळणूक करण्याचा प्रसंग येणार नाहीं असाच धंदा करावा. सांपत्तिक फायदा पण नैतिक हानीं असा धंदा कधींहि पतकरूं नये.

दारू, अफू, गांजा, तंबाखू, चहा वगैरे मादक पदार्थ विकण्याचा धंदा फायदेशीर असला तरी तो चांगला नव्हे. या धंद्यांत आपला खप वाढवणें ह्मणजे हजारों लोकांला व्यसनी बनवणें, व त्यांच्या बायकापोरांचे हाल होण्यास अप्रत्यक्षपणें कारणीभूत होणें होय. त्याचप्रमाणें खाटकाचा वगैरे धंदाहि नैतिकदृष्ट्या अवनतीच करणारा आहे. दारू, अफू, चहा, गांजा, गोमांस वगैरे विकणारे लोकांस पैसा चांगला मिळतो हें खरें, पण वाईट धंद्यांत जास्त नफा असा नियमच आहे. उदाहरणार्थ शेतांत खपणारी किंवा मोलमजुरी कर-

णारी स्त्री एका दिवसांत जितका पैसा मिळवते त्यापेक्षां कितीतरी जास्त पैसा वेश्येचा धंदा करणारी स्त्री मिळवते. एखादा सशक्त मजूर एक दिवसांत जितका पैसा मिळवतो त्यापेक्षां चोरीचा धंदा करणारा मनुष्य कितीतरी अधिक पैसा मिळवतो; तात्पर्य—अन्याय, अनीति किंवा मानसिक अवनती होणाऱ्या धंद्यांत जास्त पैसा मिळतो; पण तो पैसा मेहनतीचा मोबदला नव्हे; तो नीति देऊन मिळवलेला मोबदला असतो. तेव्हां व्यसनें वाढवणारे, अनीतीस उत्तेजन देणारे व प्राणीहत्येस मदत करणारे धंदे सहसा करूं नयेत.

वर सांगितलेल्या प्रकारचे धंदे सोडून दुसरा कोणताहि धंदा करण्यास हरकत नाहीं. **ज्या धंद्याची आपल्याला आवड असेल व ज्या धंद्याला लागणारे गुण आपले अंगीं असतील तो धंदा बेलाशक करावा.** धंद्यामुळें मनुष्याला कमीपणा येतो हें ह्मणणें व्यर्थ आहे. मुख्यत्वेंकरून सद्वर्तन व संपत्ती यांचे योगानें समाजांत मनुष्याला मान मिळतो व दुर्वर्तन व दारिद्र्य हीं मनुष्याला समाजांत कमीपणा आणतात. तेव्हां आपलें वर्तन चोख ठेवलें आणि पैसा मिळवला ह्मणजे समाजांत आपोआप मान मिळतो. एक मुलगा शाळेंत मंदबुद्धि व उनाड ह्मणून प्रसिद्ध होता, अर्थात् त्याचे हातून शिक्षण झालें नाहीं. पुढें गरिबीमुळें त्याला पोटाकरतां मुंबईस येऊन फराळाचे दुकानांत नोकरी धरावी लागली; त्याला चांगलें समजूं लागल्यावर तो दुकानांतील सर्व जिन्नस करावयास शिकला,

आणि दुकान चालवण्याच्या खुब्या त्यानें समजून घेऊन काटकसरीनें वागून थोडेंसें भांडवल गोळा करून एक लहानसें दुकान घातलें. त्या दुकानांत तो स्वतः फारच मेहनत करीत असे. प्रत्येक गोष्टीवर स्वतः लक्ष ठेवी. कांहीं दिवसांनीं त्याचा धंदा चांगला चालू लागला. पैसे मिळाल्यावर लग्न वगैरे करून तो नीट रीतीनें वागत आहे. आज दहापंधरा हजारांचा जमीनजुमला घेऊन तो आपल्या गांवांत प्रतिष्ठित व सुखी लोकांत मोडत आहे; त्याचें दुकान अद्याप चांगलें चाललें आहे. त्याच्याच गांवचे, त्याच्याच वर्गातले, हुषार म्हणून नांवाजलेले कांही मुलगे इंग्रजी पांचसात ईयत्ता शिकून नोकऱ्या धरून जेमतेम पोट भरीत आहेत. त्यांना गांवांत मान कितपत मिळतो तें त्यांनाच विचारावें. दुसरा एक इंग्रजी सहासात ईयत्ता शिकलेला गृहस्थ आमचे पहाण्यांत आहे. त्यानें भाजीच्या धंद्यापासून सुरुवात केली. कांहीं दिवस स्वतः डोक्यावर भाजी घेऊन त्यानें चाळींतून फेरी केली; पुढें बरोबर नोकर घेऊन फिरूं लागला व आस्ते आस्ते शेट बनून तो आतां प्रतिष्ठित व्यापारी झाला आहे. तेव्हां नोकरीपेक्षां धंद्यांत कमीपणा आहे या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. प्रामाणीकपणें धंदा करून मनुष्यानें पैसा मिळवला आणि आपलें वर्तन चांगलें ठेवलें म्हणजे त्याला समाजांत आपोआप मान मिळतो.

आतां खाणावळवाले, फराळाचे दुकानदार, वगैरे कांहीं धंदे-

वाल्यांस समाजांत मान असावा तितका नसतो, याचें कारण ते बहुतकरून अशिक्षित असतात आणि जवळ थोडासा पैसा होतांच उर्मट, असभ्य व व्यसनी बनतात. तेव्हां कांहीं धंदेवाल्यांस त्यांनीं मिळवलेल्या पैशाचे मानानें समाजांत मान मिळत नाहीं याचा दोष त्यांच्या धंद्याकडे नाहीं आणि समाजाकडेहि नाहीं. दोष त्यांच्या वर्तनाचा. जे धंदेवाले सभ्य रीतीनें व नीतीनें वागून पैसा मिळवतात त्यांस समाजांत मान मिळतो. हेच धंदे सुशिक्षित व सद्वर्तनी लोक करूं लागतील तर त्यांस समाजाकडून योग्य मान मिळाल्यावांचून रहाणार नाहीं. तात्पर्य मनुष्याला धंद्यामुळें समाजांत कमीपणा येत नसून **दारिद्र्यामुळें व दुर्वर्तनानें कमीपणा येतो आणि संपत्ती व सद्वर्तन यांचे योगानें मान मिळतो.**

आपण कोणता धंदा करावयाचा हें ठरवण्यापूर्वीं आपल्या आंगीं गुण कोणते व दोष कोणते आहेत हें ओळखलें पाहिजे, व कोणत्या धंद्याला कोणते गुण लागतात हेंहि माहीत असलें पाहिजे. आपले स्नेहीसोबती या कामीं फार उपयोगी पडतील. आपल्या बरोबरीच्या स्नेह्यांस आपल्या आंगचे गुणदोष जसे दिसतात तसे दुसऱ्या कोणास दिसत नाहींत त्याचप्रमाणें आपल्या जवळच्या आप्त मनुष्यांसहि आपले गुणदोष ठाऊक असतात. अभिमान बाजूला ठेवून आपल्या स्नेह्यांपासून व आप्तांपासून आपले मुख्य गुणदोष समजून घेतले तर फार फायदा होईल. कारण गुणदोष ओळखण्यांत चूक झाली तर

धंद्याची निवड करण्यांतहि चूक होईल, व ती दुरुस्त करणें कठीण पडून जन्माचें नुकसान होण्याचा संभव आहे.

साधारणपणें ' लहानपणापासून ज्याची आवड असेल आणि तरुणपणीं ज्याची गोडी लागेल त्या धंद्यांत मनुष्याला यश आल्यावांचून रहात नाहीं. याकरतां ' ज्याला ज्या धंद्याची आवड असेल त्यानें तो धंदा करावा. ' हा सामान्य नियम ठरवण्यास हरकत नाहीं.

ज्या धंद्याची आपल्याला आवड असते त्या धंद्याकडे साहाजिकपणेंच आपलें लक्ष वेधतें व त्यांतील खुब्या चटकन् ध्यानांत येऊन मनुष्य त्या कामांत लवकर प्रवीण होतो. समजा, एखाद्याला गाण्याची आवड आहे; तर तो मनुष्य गाणें ऐकण्याची संधी फुकट घालवीत नाहीं, इतकेंच नव्हे, पण अनेक अडचणी सोसून गाणें ऐकण्यास जातो आणि ऐकलेलीं गाणीं लक्षांत ठेवण्याचा व स्वतः ह्मणण्याचा प्रयत्न करूं लागतो. प्रयत्नाचें फळ त्याला मिळूं लागतें. ऐकलेल्या गाण्यांचें त्याला थोडेंबहुत अनुकरण करतां येऊं लागतें. त्यांत त्याला कोणी शिकवणारा भेटला ( इच्छा असल्यास कोणीतरी भेटतोच ) किंवा तो गायनशाळेंत जाऊं लागला कीं तो लवकर गवई बनतो. कारण ऐकून ऐकून त्याचे कान तयार झालेले असतात, ह्मणजे जें ऐकलें तें लक्षांत ठेवण्याची व त्याप्रमाणें तोंडानें ह्मणण्याची त्याला थोडीशी संवय झालेलीच असते; यामुळें शिकवलेलें त्याचे लक्षांत चटकन येतें व ध्यानांत रहातें. शिवाय त्याला आवड असल्यामुळें येतां

जातां अवशी पहाटे, त्याचे मनांत तो जें शिकत असतो तेंच घोळत असतें. यामुळें त्याचा अनायासें अभ्यास होऊन तो गायन कलेंत फारच लवकर तयार होतो. ज्याला गोडी नाहीं तो चार पांच वर्षांत जें शिकतो तें, ज्याला गोडी आहे तो वर्ष दोन वर्षांत शिकतो. शिवाय पुढेंहि ज्याला आवड आहे त्याची भराभर प्रगति होत जाते. कारण त्याचें लक्ष नेहमी गाण्याकडे असतें. तो अनेक अडचणी सोसूनहि उत्तम गवयाचें गाणें ऐकण्याची संधि फुकट जाऊं द्यावयाचा नाहीं; आणि तो नाटकाला गेला, कथेला गेला किंवा गवयाच्या गाण्याला गेला तरी कांहींना कांहीं नवीन शिकून किंवा एखादी खुबी समजून घेऊन आल्यावांचून रहावयाचा नाहीं. त्या विषयावरील पुस्तकें वाचून, व्याख्यानें ऐकून किंवा लेख वाचून मिळेल तितकी विषयाची माहिती मिळवून घेण्यास तो तत्पर असतो. यामुळें त्या कलेंत तो फार लवकर तयार होतो व चांगला प्रवीण होतो. पण ज्याला गोडी नाहीं तो आपल्याला लवकर येत नाहीं म्हणून कंटाळून सोडून देतो. त्याहून शिकत राहिलाच तरी त्याची त्या विषयांत फारशी प्रगती होत नाहीं. कारण तो जें शिकतो तें त्याचे लवकर ध्यानांत रहात नाहीं, आणि त्यांतील मर्महि त्याचे लक्षात येत नाहीं. त्याहून तो तयार झालाच तरी सामान्य प्रतीचाच होतो.

यावरून आपले आवडीचे धंद्यांत लवकर प्रगती कां होते व कशी होते हें लक्षांत येईल.

दादर येथें एक आमच्या परिचयाचे गृहस्थ आहेत. यांना लहानपणापासून मोत्यांची माहिती मिळवण्याचा सहज नाद लागला. लहानपणीं कोणी मोतीं विकत घेत असलें ह्मणजे हे गृहस्थ तेथें जाऊन उभे रहात. मोत्यांची पारख, त्यांचा दर वगैरे संबंधें कोण काय बोलतें त्याकडे त्यांचें लक्ष असे. असें करतां करतां त्यांना आपोआप मोत्यांची थोडथोडी माहिती मिळूं लागली व साधारण टोकळ मानानें पारख करतां येऊं लागली. त्यानंतर त्यांना गरिबीमुळें मुंबईस येऊन पंधरा वीस रुपयांची नोकरी धरणें भाग पडलें. मुंबईत काय आणि कोठेंहि काय मोत्यांची खरेदी लोक करीतच असतात, आणि मुंबईच्या चाळींतून दरसाल लग्न सराईत तर मोत्यांची बरीच खरेदी होते; पण मोत्यांची पारख फारच थोड्या गृहस्थांना असते. यामुळें वरील गृहस्थाना साहजीकपणेंच ‘ जरा हीं मोतीं पहाहो ’ ह्मणून लोक सांगूं लागले. त्यांना आवडच असल्यामुळें ते हौसेनें वेळ मोडून पारख करून देऊं लागले. पुढें आपल्याला मोत्यांची चांगली पारख करतां येते, अशी त्यांची खात्री पटली; तेव्हां आपण हाच धंदा करावा असें त्यांचे मनांत येऊं लागलें. नंतर त्यांनीं हळूहळू, लोकांना मोतीं विकत घेऊन देण्यास सुरवात करून, आस्ते आस्ते जुनीं अगर नवीं मोत्यें खरेदी करून, कुडीं, नथी वगैरे दागिन्याकारितां मोतीं विकण्याचा धंदा सुरू केला कोणाजवळहि

न शिकतां निवळ आवड असल्यामुळें त्यांना हा धंदा साध्य झाला. आज त्यांचा धंदा चांगला चालला आहे. ते दरमहा पांच सातशें रुपये मिळवतात. बी. ए. व एम. ए. नोकरी करून काय मिळवतात बरें !

यावरून आपल्या आवडीच्या धंद्यांत लक्ष घातलें असतां प्रतिकूल परिस्थितींतहि मनुष्याचा कसा भाग्योदय होतो हें लक्षांत येईल.

तेव्हां ज्या धंद्याची लहानपणापासून आवड असेल तो धंदा शिकण्याची संधी कधींहि फुकट न दवडतां, नेहमी त्याच धंद्याकडे लक्ष ठेवावें, त्याचा विचार करावा, त्याची मिळेल तितकी माहिती मिळवावी, म्हणजे त्यांत मनुष्य आपोआप प्रवीण होतो, आणि कोणत्याहि धंद्यातील प्रवीण मनुष्याला स्वतंत्र धंदा करतां येतो, निदान त्याला त्या धंद्यांत नोकरी मिळण्यास अडचण पडत नाहीं, आणि एकदां धंद्यांत प्रवेश झाला कीं प्रवीण मनुष्य त्या धंद्यात पुढें सरसावल्यावांचून रहात नाहीं.

एकंदरींत 'ज्याला ज्या धंद्याची आवड असेल त्यानें तोच धंदा करावा.' परिस्थिती प्रतिकूल असेल तर पोटाचा उद्योग करून फावल्या वेळांत आपल्या आवडत्या धंद्याची माहिती मिळवून त्यांत प्रवीण व्हावें म्हणजे अखेरीस त्याच धंद्यांत भाग्योदय झाल्यावांचून रहाणार नाहीं.

# नोकरी ऊर्फ कारकुनी.

सर्वांत कनिष्ट नोकरी, त्यांतले त्यांत जज्ज मामलेदार वगैरे अधिकाराच्या नोकऱ्या बऱ्या, तरी पण कांहीं झालें तरी नोकरी ह्मणजे ताबेदारीच. मोठ्या पगाराची नोकरी झाली तरी तींत वरिष्ठाच्या मर्जीप्रमाणें वागण्याचा प्रसंग येतोच; तथापि लोकांत मान व बराच पैसा मिळतो. पण अशा नोकऱ्या मिळण्याचें भाग्य फारच थोड्या लोकांचे वांट्यांस येतें.

प्रत्येक तालुक्यांत एकाला जज्ज व एकाला मामलेदार होतां येतें. पण व्यापारी किंवा शेतकरी शेंकडों लोकांस होतां येतें; आणि त्याना आपल्या गांवीं स्वतंत्र बाण्यानें रहातां येऊन मामलेदार व जज्ज वगैरे नोकरांप्रमाणें पाठीवर बिऱ्हाड घेऊन हुकूम येईल तिकडे जावें लागत नाहीं. गुरें ढोरें नोकर चाकर ठेवून सुखानें रहातां येतें. सामाजिक अगर सार्वजनिक कामांत पडतां येतें; स्वतंत्रपणें विचार करतां येतो व उघडपणें बोलतां येतें. मामलेदार, मुन्सफ झाले तरी त्यांचे तोंडाला कुलूपच असतें. शिवाय त्याना वरचे हुकूम पाळण्याकरतां आपल्या मताविरुद्ध गोष्टी कराव्या लागून त्यांचा सर्व दोष मुकाट्यानें आपले माथीं घ्यावा लागतो. व्यापारी किंवा शेतकरी आपल्या मताप्रमाणें वागण्यास अगर बोलण्यास मोकळा असतो.

शिवाय नोकरींत मनुष्याच्या आंगच्या गुणाचें चीज होत नाहीं. एखादा मोठा बुद्धिवान्, कर्तृत्ववान्, कल्पक, व्यवहारकुशल, हिमती, धैर्यवान्, धाडसी व महत्वाकांक्षी मनुष्य असला तरी सरकारी नोकरींत त्याला इतर लोकांपेक्षां विशेष असें कांहींएक करतां येत नाहीं. ठरलेल्या नियमांप्रमाणें बढती, ठरलेला पगार, ठरलेलें काम. समजा असा मनुष्य मामलेदार झाला किंवा मुन्सफ झाला तर त्याचे हातून विशेष असें काय होणार ? इतर दहां प्रमाणेंच हा अकरावा. स्वभावानें दयाळू असला तर लोकांना त्रास देणार नाहीं, इतकेंच; पण त्याचे गुणांचा उपयोग काय ? कांहीं नाहीं, सामान्य प्रतीचे मुन्सफमामलेदार व हा यांत विशेष असा फरक नाहीं; पण तोच जर एखाद्या कारखान्याचा म्यानेजर होईल तर कारखाना भरभराटीला आणील आणि आपणहि भरपूर पैसा मिळवील. मामलेदार होईल तर त्याला आपला तालुका भरभराटीला आणणें शक्य नाहीं, कारण त्याला ठरींव नियमाच्या बाहेर कांहीं करण्याचा अधिकारच नसतो. बरें हा कर्तृत्ववान् ह्मणून याला कोणी इतरांपेक्षां जास्त पगारहि देणार नाहीं.

सरकारी नोकरींतून निघून खासगी धंदा करूं लागणारे लोक फारच विरळा असतात, परंतु अशीं कांहीं उदाहरणें आमचे पहाण्यांत आहेत. त्यांपैकीं एक बी. ए. असून मुंबईस सेक्रेटरीएटमध्यें नोकरी करीत होते, पुढें कांहीं कारणानें नोकरींतून निघून ते धंदा

करूं लागले. आज त्यांनीं हजारों रुपये मिळवले आहेत, व अजूनहि मिळवितील. मुंबईसारख्या शहरीं राहून त्यांनीं जन्मभर सरकारी नोकरी केली असती तरी यांना पैसा शिल्लक टाकतां आला असता काय? दोन खोल्यांत आपलें बिऱ्हाड थाटून सेक्रेटरीएटमध्यें नोकरी करणारे बी. ए. मुंबईत बरेच आहेत, त्यांची स्थिती पाहून यांची स्थिती आज काय असती याची कल्पना करतां येईल.

दुसरे एक गृहस्थ दादर येथें रहातात. हे तडफेचे, बुद्धिवान व कर्तृत्ववान गृहस्थ स्कूलफायनल होऊन सेक्रेटरीएटमध्यें नोकरी धरून दहा बा वर्षांत दरमहा पाउणशें रुपये मिळवूं लागले होते. पुढें नोकरी सोडून ते धंदा करूं लागले. आज त्यानीं दहा बारा हजा-हजारांची जमीन घेतली आहे व सोनें नाणेंहि खरेदी केलें आहे, यावरून त्यानीं किती पैसा कमवला याची कल्पना होईल. त्यांचा धंदा चांगला चालला आहे आणि हे गृहस्थ पुढेंमागें आपल्या कर्तबगारीच्या जोरावर यांपेक्षांहि मोठमोठे धंदे अंगावर घेऊन भरपूर पैसे मिळवतील यांत संशय नाहीं.

हे गृहस्थ अजून सरकारी नोकरींत असते तर त्यांना गेल्या दोन तीन वर्षांत जरी पगार वाढला असता तरी मुंबईतील वाढत्या महागाईत वाढत्या कुटुंबाचा खर्च भागवून त्याना कितीशी शिल्लक टाकतां आली असती! त्यांनीं नोकरी सोडून स्वतंत्र धंदा केला म्हणूनच

त्याना आपल्या गुणांच्या व कर्तबगारीच्या बळावर हजारों रुपये कमवतां आले.

एकंदरींत मनुष्याच्या आंगच्या गुणाचें व कर्तबगारीचें नोकरींत चीज होत नाहीं, परंतु व्यापार धंद्यांत मात्र ज्याच्या त्याच्या गुणाप्रमाणें व कर्तबगारीप्रमाणें फळ मिळतें हें स्पष्ट दिसून येईल. आमच्या तरुण ग्याजुएटांनीं व स्कुलफायनल आणि म्याट्रिक पास झालेले तरुणांनीं वरील दोन गृहस्थांचीं उदाहरणें पाहून नोकरी धरण्यापूर्वी नीट विचार करावा. अशीं आणखी पुष्कळ उदाहरणें आहेत पण तीं येथें देण्यास जागा नाहीं. तरीपण/बुद्धिवान, धैर्यवान, कर्तृत्ववान्, हिमती व महत्त्वाकांक्षी तरुणांनीं नोकरी धरून आपल्या जन्माचें मातेरें करून घेऊं नये. मनुष्याच्या अंगी कितीहि गुण असले तरी नोकरींत त्यांचें चीज होत नाहीं. कदाचित वरिष्ठांच्या मेहरबानीनें थोडीबहुत बढती मिळालीच तरी ती दगडापेक्षां वीट मऊ या प्रकारचीच असते. तेव्हां व्यापार धंदा किंवा शेतीवाडी करून दरमहा दोनचारशें रुपये मिळवण्याची ज्यांचे आंगीं धमक आहे, त्यांनीं मोठ्या पगाराच्या नोकऱ्यांच्याहि नादीं लागूं नये.

कांहीं लोकांना नोकरी मानाची वाटते, पण खरें पाहिलें तर नोकरींत मान मुळींच नाहीं. नोकराला वरिष्ठाचे हुकूम पाळावे लागतात, इतकेंच नव्हे तर त्याची मर्जी संभाळावी लागते. आपलें शहाणपण व सदसद्विवेकबुद्धि गुंडाळून ठेवावी लागते, खरें खोटें बोलावें लागतें,

वरिष्ठापुढें ह्यः ह्यः करून दांत विचकावे लागतात, तो विनाकारण वाटेल तें बोलला तरी तें सोसून उलट ' माफ करा साहेब ' ह्मणून ह्मणावें लागतें; तेव्हां अशा या नोकरीला मानाची असें ह्मणणें ह्मणजे मूर्खपणाच होय.

शिवाय नोकरपेशाचे मनुष्याचे आंगचे गुणाचा ऱ्हास होत जातो. मनुष्याचा जो गुण किंवा अवयव बैठा रहातो, त्याची वाढ न होतां उलट तो दुबळा होत जातो. वेदपठण करणारांची पाठशक्ती वाढते, घण मारणाराचे दंड बळकट होतात. धांवणारांचे पाय मजबूत होतात. उलट पक्षीं नेहमी बसून रहाणारांचे सर्व अवयव दुबळे होतात. कांहीं एक पाठ न करणारांची पाठशक्ती मठ्ठ होते. नेहमीं बसून काम करणारांस मैल दोन मैलही चालववत नाहीं. एक हात वर धरून फिरणाऱ्या साधूंचा तो हात बारीक व दुबळा होतो. तात्पर्य ज्या अवयवांचा किंवा गुणांचा मनुष्य नेहमीं उपयोग करतो, त्यांची वाढ होत व ज्यांचा उपयोग करीत नाहीं त्यांची शक्ती कमी होते, असा सृष्टी-नियम आहे. या नियमाप्रमाणें नोकर पेशाचे मनुष्याला जरूर नसलेले त्याच्या आंगचे स्वाभिमान, तेजस्विता, कल्पकता, धाडस, धैर्य, चिकाटी, शोधकबुद्धी वगैरे गुण कमी होऊं लागतात. आणि हांजिखोरपणा, दुबळेपणा, शिळपटपणा, स्वाभिमानशून्यता, लांगूलचालन, असत्य भाषण वगैरे दुर्गूण वाढून त्यांची मानसीक अवनती होते.

असें असून आमच्या महाराष्ट्रीय तरुणास नोकरीचें ऊर्फ कार-

कुनोचें वेडच लागलें आहे. जो उठला तो कारकुनी पतकरतो. जणु काय कारकुनीवांचून पोट भरण्यास दुसरें साधनच नाहीं. सरकारी कचेऱ्या, पोष्टखातें, रेलवेखातें हीं महाराष्ट्रीय कारकुनांनी गजबजून गेलीं आहेत. मात्र व्यापार धंद्यांत महाराष्ट्री-यांचा शुकशुकाट. असें कां व्हावें ? हा परिस्थितीचा ओघ. या ओघाबरोबर आह्मी वहावत गेलों; पण आतां ओघाचे ओढींतून जर सुशिक्षित लोक बाहेर पडले नाहींत तर ते दारिद्र्यांत बुडून समा-जाच्या तळाला जाऊन बसतील. सर्वांत दरिद्री कोण तर 'महाराष्ट्रां-तील सुशिक्षित.' अशी स्थिती होईल./ आजच मुंबईत कारकुनाला पन्नास पाऊणशें रुपये मिळतात, व ग्रॅज्युएटाला पाऊणशें शंभर मिळतात, आणि हमाल, सुतार, फिटर, गवंडी वगैरे लोक रोज दोनअडीच रुपये मिळवितात. तेव्हां कारकुनीची आजच काय किंमत आहे हें लक्षांत येईल. बरें कारखान्यांतून वगैरे काम करणारे लोक संप वगैरे करून आपला पगार महागाईचे मानाने वाढवून घेतात, पण कारकुनीपेशाला तेंहि शक्य नाहीं.

अशी स्थिती प्राप्त झाली असूनहि अद्याप सुशिक्षितांचा नोकरी-कडे ओढा कां ? याचें मूळ फार दूर आहे. तो मागच्या वळणाचा प्रभाव आहे. ज्या वेळीं आपलें राज्य जाऊन इंग्रजांचें राज्य महा-राष्ट्रावर सुरू झालें त्यावेळीं सरकारला इंग्रजी शिकलेल्या माणसांची फार जरूरी होती. त्यावेळीं हवीं तितकीं इंग्रजी शिकलेलीं

माणसें मिळत नसत. यामुळें जीं थोडीं मिळत त्यांची किंमत वाढली. त्यांना एकदम मोठा पगार व भरपूर अधिकार मिळूं लागला. यामुळें समाजहि त्यांना मान देऊं लागला. पुढें पोष्ट, तार, रेलवे वगैरे खात्यांतहि इंग्रजी शिकलेल्यांची जरूर लागूं लागली. इंग्रजी शिकलेले लोक कमी असल्यामुळें त्यांना त्यावेळच्या स्वस्ताईचे मानानें पगार बरा मिळे. अगदीं खालच्या दर्जाचा कारकूनहि पांचदहा माणसांचा चरितार्थ चालवून, मुलांचीं लग्नें कार्यें करून पोटापुरती शेतीवाडी व घरदार करून म्हातारपणी सुखानें पेन्शन खात राही. शिवाय कारकुनी म्हणजे सुखी सावलीची नोकरी. दगदग नाहीं, धांवाधांव नाहीं, उन्हातान्हातून हिंडावयास नको, काम बेताचें, आणि इंग्रजी शिकलेले लोक भरपूर मिळत नसल्यामुळें वरिष्ठहि गोडीगुलाबीनेंच वागवीत. यामुळें साहजीकच सर्व लोकांचा ओढा इंग्रजी शिकून नोकरी धरण्याकडे लागला.

पण आतां ती स्थिती पालटली आहे. आतां इंग्रजी शिकलेले लोक हवे तेवढे मिळतात, नव्हे त्यांस ‘ जागा नाहीं ’ म्हणून सांगतां सांगतां पुरे वाट होते. यामुळें त्यांची किंमत उतरली आहे. त्यांतच चढाओढ सुरू होऊन नोकरी मिळवण्यास वशिले लागूं लागले. बिनपगारी उमेदवारी करण्याची पाळी येऊं लागली. एक सोडून गेला तर तेंच काम दुसरा कमी पगारांत करण्यास तयार होतो. यामुळें त्यांची किंमत अधीकच उतरली, आणि महागाईचे

मानानें पगाराची वाढ झाली नाहीं. शिवाय नोकरांना वाटेल तसे वागवलें तरी ते नोकरी सोडून न जातां उलट हांजी हांजी करतात. यामुळें अधिकारी त्यांस वाटेल तें बोलतात व लहरीप्रमाणें हवें तसें वागतात.

एकंदरींत एकाकाळीं नोकरी मानाची, फायद्याची व सुखाची होती. पण आतां ती तशी राहिली नाहीं. हल्लीं कारकुनी पेशाच्या मनुष्याला तर, आपला चरितार्थ नीटपणें चालवणें कठीण पडतें. चारपांच मुलें झालीं तर तीं जड वाटतात. मग एखादी विधवा बहीण, भावजय किंवा काकी मामी पोसणें तर अशक्यच. मुलांना शिक्षण देणें तें नाइलाज ह्मणून कसेंतरी पार पाडावयाचें आणि त्यांचीं लग्नेंकार्यें करणें ह्मणजे तर संकटच वाटतें.

अलीकडे लढाईजन्य महागाई झाल्यापासून तर कारकून पेशाच्या नोकरांना कदान्न खाऊन जेमतेम कसातरी निर्वाह करावा लागतो. त्यांतच आजारीपणामुळें किंवा लग्नकार्यामुळें कर्ज काढण्याची पाळी आली ह्मणजे तें कसें फिटेल ही काळजी करीत व अडचणी सोशीत कसेतरी दिवस कंठावे, अशी स्थिती प्राप्त झाली आहे.

एकंदरीनें या कारकुनी पेशाच्या नोकरीमुळें मानसिक अवनती होते, पैशाच्या अभावामुळें सुख लाभत नाहीं आणि काळजी व कदान्न यामुळें शरीर जर्जर होऊन मनुष्य अल्पायुषी होऊन चाळीस पन्नाशीचे सुमाराला आपली दुःखमय यात्रा संपवतो.

याकरतां ज्यांना लहानसहान धंदा, व्यापार किंवा शेती करणें शक्य आहे त्यांनीं या कारकुनीच्या नादीं लागूं नये.

कांहीं खेडीं आहेत. या गांवीं एक बोहरी दरसाल आठ महिने किराणा मालाचें दुकान घालून बसतो, व पावसाळ्यांत दुकान बंद करून एक पैहि कोणाकडे उधारी न ठेवतां सर्व वसूल करून चार महिने आपल्या देशीं जाऊन रहातो. हा बोहरी दरसाल आठ-दहा हजार रुपये निवळ नफयाचे रूपानें या गावांतून घेऊन जातो. असें त्यानेच स्वतः कबूल केलें. शिवाय या गांवीं एक मारवाडी कायमचें ठाणें देऊन बसलाच आहे तोहि व्याजबट्टा व इतर व्यापार करून पांच दहा हजार रुपये नेतच असेल.

हें एक गांव व आजूबाजूचीं खेडीं मिळून जर इतका पैसा दरसाल परप्रांतीं जात आहे तर सबंध महाराष्ट्रांतून किती जात असेल? लाखों किंवा कांहीं कोटी रुपये जात असतील!! आज कमीतकमी पांच पन्नास वर्षें व्यापाराचे रूपानें चढत्या प्रमाणानें महाराष्ट्रांतून संपत्तीचा ओघ परप्रांतीं जात आहे. तेव्हां आह्मीं इतर प्रांतांतील लोकांपेक्षां गरीब होण्याचें मुख्य कारण हा संपत्तीचा बाहेर जाणारा ओघ होय. सुशिक्षित लोक व्यापार धंद्यांत पडल्यावांचून हा ओघ थांबणार नाहीं, आणि आमची स्थिती दिवसेंदिवस खालावत गेल्यावांचून रहाणार नाहीं. तरुणानो! सुशिक्षितानों! देशभक्तांनों! नोकरीचा मोह सोडून व्यापार धंदा करूं लागाल तर तुह्मी श्रीमंत व्हाल, तुमच्या मुलांबाळांना सुख लाभेल आणि महाराष्ट्राचेंहि हित होईल.

---

# धंदे पुष्कळ आहेत.

आमच्या तरुणांस व्यापार धंदा करावा ह्मणून उपदेश केला आणि तो त्यांस पटला तरी वेळ आली ह्मणजे ते पटकन नोकरीच धरतात. याचें कारण आह्मांस व्यापारी वळण नाहीं व व्यापारी परंपरा नाहीं. कित्येक शतकांपासून महाराष्ट्रांत व्यापारी पेशाला फारसा मान नाहीं. मुसलमानी अमदानींत महत्वाकांक्षी लोकांचा ओढा शिपाइगिरी, शिलेदारी व सरदारी करून जहागिरी व वेतनें मिळवण्याकडे असे. देशमूख, देशपांडे, कुळकर्णी, पाटील यांना जो मान असे तो मोठमोठ्या व्यापाऱ्यांना नसे.

पुढें शिवाजी महाराजांनीं स्वराज्य मिळवल्यापासून तर शिपाई-गिरी व सरदारीला अधिकच महत्व आलें, व किल्लेदार, चिटणीस, कारखानीस, मामलेदार वगैरे जागा मानाच्या व फायद्याच्या होऊन बसल्या. उरले सुरले महत्वाकांक्षी लोक सरदार जहागिरदारांचे दिवाण, कारभारी किंवा मुत्सद्दी होऊं लागले. अशा स्थितींत व्यापारी पेशाला कोण मान देतो ! पुढें इंग्रजी झाल्यावर सरदार जहागि-रदार व वतनदार आपलीं वतनें संभाळण्यांत भूषण मानून स्वस्थ बसले आणि बुद्धिवान् लोक इंग्रजी शिकून मोठमोठ्या नोकऱ्या पटकावूं लागले; त्यामुळें नोकरीचा मान वाढला व तिकडे सर्वांचा

# आम्हीं गरीब कां झालों.

आमचे सुशिक्षित लोक व्यापारधंद्याकडे लक्ष न देतां नोकरींत गुरफटून रहात असल्यामुळें त्यांना गरिबींत दिवस कंठावे लागून शिवाय राष्ट्राचेंहि नुकसान झालें आहे. एका शतकापूर्वीं संपन्न असलेला महाराष्ट्र आज इतर प्रांतांचे मानानें अगदीं गरीब झाला आहे. यामुळें आमच्या सार्वजनिक चळवळींस यावा तसा जोर येत नाहीं. बुद्धिवान, विद्वान व कर्तृत्ववान अशीं पहिल्या प्रतीचीं माणसें सरकारी नोकरीत अडकल्यामुळें सार्वजनिक कामें आंगावर घेण्यास उत्तम माणसें मिळणें कठीण पडतें. स्वतंत्र धंदे करणारीं माणसें फार कमी. त्यांतून कांहीं सामान्य प्रतीचीं व कांहीं उत्तम माणसें स्वार्थत्याग पूर्वक सार्वजनिक कामांत पडतात त्यांस असावें तसें पैशाचें पाठबळ नसल्यामुळें त्यांचीं कामें लंगडीं पडतात. आमचे महाराष्ट्रीय फार झालें तर एक दिवसाचा पगार दोन तीन रुपये किंवा एक महिन्याचें उत्पन्न पाऊणशें शंभर रुपये देणार. दहा पांच हजार रुपये सहज देण्याचें सामर्थ्य असलेले लोक महाराष्ट्रांत अगदींच कमी आहेत हें अनुभवावरून सिद्ध झालें आहे. ज्यांना लाख दोन लाख रुपये सहज देतां येतील असे लोक नाहींतच ह्मटलें तरी चालेल; मग पांच दहा लाख पंचवीस लाख यांची गोष्टच बोलावयास नको.

बंगाली, पंजाबी, मद्रासी, पारशी, मारवाडी, खोजे, मेमन, भाटे,

वाणी यांत हजारांनीं व लाखांनीं देणग्या देणारे लोक पुष्कळ आहेत. आणि ते बहुतेक व्यापारी आहेत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आजकाल सर्व जगांत व्यापारी तो श्रीमंत अशी स्थिती आहे. आह्मी महाराष्ट्रीय व्यापारधंद्यांत पडतच नाहीं, यामुळें आह्मीं श्रीमंत होण्याचें बाजूसच राहून उलट अधिकाधिक गरीबच होत चाललों आहों.

आह्मी व्यापार धंदा करीत नसल्यामुळें आह्माला पैसा मिळत नाहीं इतकेंच नव्हे पण उलट आमच्या घरांतील पैसा आह्मीं आपल्या हातानें परप्रांतीयांचे हातीं देत आहों. आमच्या महाराष्ट्रांतील बहुतेक व्यापार धंदा परकीयांचे हातीं गेला आहे. एवढी ही संपन्न आणि व्यापारी केंद्रस्थान मुंबई, पण ती सर्वस्वी परप्रांतीयांची आहे. हवेल्या, चाळी, गिरण्या, कारखाने, दुकानें सर्व त्यांचीं. शेंकडा पांच तरी आमचीं आहेत कीं नाहीं याची शंकाच आहे. आह्मी निवळ नोकरी करून पोट भरणारे. आमच्या प्रांतांतील प्रमुख शहरांत आमची ही स्थिती ! !

इतर शहरांतील व्यापारहि मुख्यत्वेंकरून परप्रांतीयांचेच हातीं आहे, आणि दिवसें दिवस खेड्यापाड्यांतीलहि व्यापार ते बळकावूं लागले आहेत. महाराष्ट्रांतील हजार दोन हजार वस्तीच्या प्रत्येक गांवांत मारवाडी, वाणी किंवा बोहरी, कोणीना कोणी तरी असतोच. आमचे माहितीचे एका गांवीं सुमारें तीनशें घरें आहेत व आजूबाजूस

कांहीं खेडीं आहेत. या गांवीं एक बोहरी दरसाल आठ महिने किराणा मालाचें दुकान घालून बसतो, व पावसाळ्यांत दुकान बंद करून एक पैहि कोणाकडे उधारी न ठेवतां सर्व वसूल करून चार महिने आपल्या देशीं जाऊन रहातो. हा बोहरी दरसाल आठ-दहा हजार रुपये निवळ नफ्याचे रूपानें या गावांतून घेऊन जातो. असें त्यानेच स्वतः कबूल केलें. शिवाय या गांवीं एक मारवाडी कायमचें ठाणें देऊन बसलाच आहे तोहि व्याजबट्टा व इतर व्यापार करून पांच दहा हजार रुपये नेतच असेल.

हें एक गांव व आजूबाजूचीं खेडीं मिळून जर इतका पैसा दरसाल परप्रांतीं जात आहे तर सबंध महाराष्ट्रांतून किती जात असेल? लाखों किंवा कांहीं कोटी रुपये जात असतील!! आज कमीतकमी पांच पन्नास वर्षे व्यापाराचे रूपानें चढत्या प्रमाणानें महाराष्ट्रांतून संपत्तीचा ओघ परप्रांतीं जात आहे. तेव्हां आह्मीं इतर प्रांतांतील लोकांपेक्षां गरीब होण्याचें मुख्य कारण हा संपत्तीचा बाहेर जाणारा ओघ होय. सुशिक्षित लोक व्यापार धंद्यांत पडल्यावांचून हा ओघ थांबणार नाहीं, आणि आमची स्थिती दिवसेंदिवस खालावत गेल्यावांचून रहाणार नाहीं. तरुणानो! सुशिक्षितानों! देशभक्तांनों! नोकरीचा मोह सोडून व्यापार धंदा करूं लागाल तर तुह्मी श्रीमंत व्हाल, तुमच्या मुलांबाळांना सुख लाभेल आणि महाराष्ट्राचेंहि हित होईल.

---

# धंदे पुष्कळ आहेत.

आमच्या तरुणांस व्यापार धंदा करावा ह्मणून उपदेश केला आणि तो त्यांस पटला तरी वेळ आली ह्मणजे ते पटकन नोकरीच धरतात. याचें कारण आह्मांस व्यापारी वळण नाहीं व व्यापारी परंपरा नाहीं. कित्येक शतकांपासून महाराष्ट्रांत व्यापारी पेशाला फारसा मान नाहीं. मुसलमानी अमदानींत महत्वाकांक्षी लोकांचा ओढा शिपाइगिरी, शिलेदारी व सरदारी करून जहागिरी व वेतनें मिळवण्याकडे असे. देशमूख, देशपांडे, कुळकर्णी, पाटील यांना जो मान असे तो मोठमोठ्या व्यापाऱ्यांना नसे.

पुढें शिवाजी महाराजांनीं स्वराज्य मिळवल्यापासून तर शिपाईगिरी व सरदारीला अधिकच महत्व आलें, व किल्लेदार, चिटणीस, कारखानीस, मामलेदार वगैरे जागा मानाच्या व फायद्याच्या होऊन बसल्या. उरले सुरले महत्वाकांक्षी लोक सरदार जहागिरदारांचे दिवाण, कारभारी किंवा मुत्सद्दी होऊं लागले. अशा स्थितींत व्यापारी पेशाला कोण मान देतो ! पुढें इंग्रजी झाल्यावर सरदार जहागिरदार व वतनदार आपलीं वतनें संभाळण्यांत भूषण मानून स्वस्थ बसले आणि बुद्धिवान् लोक इंग्रजी शिकून मोठमोठ्या नोकऱ्या पटकावूं लागले; त्यामुळें नोकरीचा मान वाढला व तिकडे सर्वांचा

ओढा लागला, तो अद्याप कायम आहे. एकंदरीनें आह्मांस व्यापाराचें वळण नाहीं, व्यापारी परंपरा नाहीं व व्यापारांत मान आहे असेंहि वाटत नाहीं. आमचें वळण नोकरीचें; त्यामुळें आमचे तरुण चटकन आपल्या वळणावर जाऊन नोकरी धरतात.

त्यांतून अलीकडे कांहीं सुशिक्षित तरुणांस व्यापार धंद्यांत पडावें असें वाटू लागलें आहे; परंतु त्यांचा पहिला प्रश्न हा असतो कीं, धंदा कोणता करूं? त्याला उत्तर हें कीं, धंदे पुष्कळ आहेत पण तुमच्या आंगीं गुण कोणते आहेत, तुह्मांला कोणत्या धंद्याची आवड आहे, तुमची परिस्थिती कोणता धंदा करण्यास अनुकूल आहे, याचा पहिल्यानें नीट विचार करा आणि मग कोणता धंदा करावयाचा हें ठरवा.

धंदेच ह्मणाल तर शेंकडों आहेत. अन्नवस्त्रापासून मनुष्याच्या गरजा सुरू होतात आणि तेथूनच धंद्याला सुरवात होते. पहिला धंदा धान्य खरेदी विक्रीचा. त्यानंतर मीठ, मिरची, दूध, तूप, लोणी, साखर, कापड, या प्रत्येक जिनसाचा एकेक स्वतंत्र धंदाच आहे. जितके जिन्नस तितके धंदे. भाजीपाला, फळें, तांब्या पितळेचीं भांडीं, जळाऊ लांकडें, कोळसे, मिठाई, सुपारी, नारळ, कापूस, लोंकर, सरकी, तेल, बदाम वगैरे मेवा, सिगारेट, तयार कपडे, टोप्या, देशी परदेशी औषधें, सोन्याचांदीची पेढी, मोत्यें हिरे माणकें, रुप्याचीं

९८०६

भांडीं, घड्याळें, कांचेचें सामान, खुर्च्या टेबलें कपाटें, कागद, स्टेशनरी, गाड्या, मोटारी, झाडांचीं कलमें, बीं बियाणे, सुगंधी तेलें, गलबतें, बोटी, वगैरे खरोखरच शेंकडों धंदे आहेत. पेढ्या, व्यांका, दलाली, मुकादमी, कंत्राटें, कारखानें, खाणी वगैरे आणखी कितीतरी धंदे आहेत.

पण यांतला कोणता धंदा करावा हेंच आमच्या तरुणांस समजत नाहीं. बरें आवड ह्मटली तर त्यांना कोणत्याही धंद्याची नसते असें ह्मटलें तरी चालेल. आणि ती असणार कोठून. कधीं धंदा ठाऊकच नाहीं, पूर्व संस्कार नाहीं, परंपरा नाहीं, वळण नाहीं मग धंद्याची गोडी असेल कशी. एखाद्या साहेबाला लाडू, पोळ्या, साखरभात वगैरे पक्वानांतून कोणतें आवडतें ह्मणून विचारलें तर तो काय सांगणार ? त्यानें तीं कधीं चाखलेलींच नसतात. आमच्या तरुणांचें असेंच होतें. त्यांना कोणत्या धंद्याची आवड आहे हें सांगतांच येत नाहीं, कारण त्यांना धंद्यासंबंधें कांहींच माहिती नसते.

त्यांतून एखादा धंदा पसंत करावा तर प्रत्येक धंद्यांत गर्दी व चढाओढ दिसते. कोणत्याहि धंद्यांत आपला शिरकाव होईल असें त्यांस वाटत नाहीं. त्याहून कोणी, एखाद्या धंद्यांत पडण्याचें धाडस केलेंच तर त्याला बहुतकरून अपयशच येतें.

### अपयश कां येतें.

अपयश येण्याच्या कारणांपैकीं आह्मांस व्यापारी वळण नाहीं

हें एक कारण आहे हें खरें, परंतु तें महत्वाचें नाहीं. मनुष्याला वळण लावावें तसें लागतें. तेव्हां आमच्या तरुणांस व्यापारी वळण लावलें तर तें लागण्यास मुळींच हरकत नाहीं. ज्या कांहीं थोड्या महाराष्ट्रीयांना असें वळण लागलें ते व्यापारधंद्यांत चांगले प्रवीण झाले आहेत. तेव्हां शिक्षण देऊन वळण लावल्यास आमचे तरुण व्यापार धंद्यांत चांगले प्रवीण होतील यांत शंका नाहीं.

महाराष्ट्रीयांचे अंगीं बुद्धि, धाडस, धैर्य, चिकाटी, सचोटी, काटकसर, वगैरे गुण आहेत, याची साक्ष इतिहास देतच आहे. आजही हे गुण आमच्या अंगीं नाहींत असें नाहीं. मग घोडें अडतें कोठें ? घोडें अडतें अनोळखी रस्त्यावर. भलत्याच रस्त्याने गेल्यामुळें आह्मांला अपयश येतें. थोडक्यांत बोलावयाचें ह्मणजे

## आह्मी रस्ता चुकतों.

आह्मी योग्य मार्गानें धंद्यांत शिरत नाहीं. धंद्याची माहिती मिळवीत हळू हळू धंद्यांत आपला प्रवेश करून घ्यावयाचा तें सोडून आह्मी एकदम धंद्यांत उडी घालतों; त्यामुळें तोंडघशीं पडतों. मनुष्याचे अंगीं कितीहि गुण असले आणि तो कितीहि कर्तृत्ववान असला तरी अनुभवीक ज्ञान असल्यावांचून त्याला व्यापारधंद्यांत यश येण्याची आशा नाहीं. परंतु आमचे कांहीं बंधू धंद्याची पूर्ण माहिती न मिळ-वितां एकदम धंद्याला सुरवात करतात, हीच त्यांची

## घोडचूक होय.

या चुकीचा परिणाम त्यांना भोगावा लागला तर नवल नाहीं. एखादा गैर माहीत मनुष्य वाटाड्या वांचून अथवा रस्ता कोणत्या दिशेनें कसा जातो याची पूर्ण माहिती मिळवल्यावांचून एखाद्या जंगलांतून पलीकडे जाण्याचा प्रयत्न करील तर त्याची जी अवस्था होईल तीच गैर माहीत मनुष्य व्यापारधंद्यांत पडला तर त्याची होते. तो त्यांतून सुरक्षित बाहेर पडला तर नवलच ह्मणावयाचें.

पूर्ण माहिती नसतां व्यापारधंदा सुरू केल्यामुळें पुष्कळ महाराष्ट्रीयांना अपयश आलेलें आहे, आणि त्यांना अपयश आलेलें पाहून आह्मीं धंद्याला नालायखच आहों असा कांहीं लोकांचा समज झालेला आहे पण तो साफ चुकीचा आहे. आह्मीं योग्य मार्गानें गेलों असतां व्यापारधंद्यांत आमचा जम उत्तम बसतो हें अनुभवानें सिद्ध झालें आहे. कांहीं महाराष्ट्रीयांनीं आह्मी दुसऱ्या लोकांइतकेच लायख आहों हें व्यापारांत यश मिळवून सिद्ध केलें आहे. आतां व्यापारधंद्यांत आपला प्रवेश कसा करून घ्यावा याचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

# धंदा कसा सुरू करावा.

व्यापार धंद्यांत भरपूर पैसा मिळतो, नोकरींत कांहीं अर्थ नाहीं अशी खात्री पटल्यामुळें अलीकडे कांहीं सुशिक्षित तरुणांना व्यापार धंदा करावा असें वाटूं लागलें आहे; परंतु त्यांस व्यापार धंद्याची माहिती कशी करून घ्यावी, हेंच कळत नाहीं. व्यापार धंदा परप्रांतीयांचे हातीं असल्यामुळें विद्यार्थी दशेंत थोडी बहुत सहजा सहजीं माहिती व्हावयाची ती होत नाहीं; कोणी हाताशीं धरून शिकवील तर आपल्या परिचयाचे व्यापारी नाहींत; आणि जरूर तें शिक्षण देणारी एखादी शाळा किंवा संस्थाहि नाहीं; तेव्हां व्यापार धंद्यांत प्रवेश कसा व्हावा हा सुशिक्षित तरुणास मोठा प्रश्न पडतो. व्याख्याते, लेखक, पुढारी, व्यापार धंदा करावा ह्मणून उपदेश करतात पण कोणी मार्ग दाखवीत नाहीं, असें कांहीं तरुणांचें ह्मणणें आहे. या करतां कोणत्या मार्गानें गेलें असतां हटकून यश मिळेल हें सांगतों.

नुसतें अमूक करावें तमूक करावें असें न सांगतां पहिल्यानें एक प्रत्यक्ष घडलेलें उदाहरण देतों. एक गृहस्थ सध्या येथें धंदा करीत आहेत. त्यांनीं इंग्रजी चारपांच यत्ता शिकून दहा वर्षांपूर्वी बाहेर गांवीं पंधरा रुपयांची नोकरी धरली. त्या वेळच्या स्वस्ताईच्या मानानें व इतर कांहीं सवलती असल्यामुळें त्यांना तितक्या

पैशांत संसार करतां आला असता व आज हल्लींच्या मानानें पगार वाढून ते इतर कारकुनांप्रमाणें पोट भरीत राहिले असते. परंतु आपण व्यापार धंदा करावा अशी त्यांची उत्कट इच्छा असल्यामुळें आपला उद्देश कसा साध्य करून घ्यावा याचा ते विचार करीत होते.

त्यावेळीं स्वदेशीची लाट उसळली होती, यामुळें आपण स्वदेशी मालाचें लहानसें दुकान काढावें असें त्यांस वाटूं लागलें, व कांहीं स्नेही सोबतीहि भर देऊं लागले. त्यांना जरूरी पुरतें भांडवलहि उभें करतां येण्यासारखें होतें. परंतु त्यावेळीं त्यांस एक गुरू भेटला. त्यानें त्यांना कानमंत्र सांगितला. तो त्यानीं श्रद्धेनें पाळला आणि त्यांना त्या मंत्राचें फळहि मिळालें. तो गुरुमंत्र आमच्या तरुणांनीं लक्षांत ठेवून पाळल्यास त्यांनाहि त्याचें फळ मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

तो गुरुमंत्र हाच कीं, ‘ दुसऱ्याकडे राहून प्रत्यक्ष काम करून पुरी माहिती करून घेतल्यावांचून पदरचा पैसा घालून धंदा करू नका. कराल तर बुडाल.’ हा मंत्र मिळाल्यावर त्यांनीं एखाद्या व्यापाऱ्याकडे पडेल तें काम करून मिळेल तो पगार घेऊन रहाण्याचा विचार ठरवला. नंतर संधी सांपडतांच ते मुंबईस येऊन एका किराणा जिनसाच्या दुकानीं दरमहा वीस रुपयांवर राहिले. ते बडोद्याकडचे रहाणारे असल्यामुळें त्यांस गुजराथी उत्तम येत होतें; त्याचा त्यांस फार उपयोग झाला. कांहीं दिवशीं ते बाजारांत जाऊन स्वतः

माल पारखून दरदाम ठरवून आणूं लागले, व त्यांस दुकान चालव-ण्याची चांगली माहिती झाली.

पुढें त्या दुकानाच्या चालकांपैकीं एक गृहस्थ वारल्यामुळें तें दुकान विकलें गेलें. तेव्हां हे गृहस्थ व त्यांचे बरोबर त्याच दुकानांत काम करीत असलेले दुसरे एक गृहस्थ या दोघांनीं प्रत्येकीं दोनशें रुपये भांडवल काढून, पूर्वींच्या दुकानाच्या चालकांपैकीं एकाचें लहानसें स्वदेशी मालाचें दुकान होतें त्या गृहस्थास भागिदार घेऊन तेंच दुकान वाढवून सुमारें सहाशें रुपयांचे भांडवलावर तिघां मिळून किराणा मालाचें दुकान सुरू केलें. पूर्वींच्या गिऱ्हाइकांची ओळख, मुंबईतील व्यापाऱ्यांची ओळख, व दुकान चालवण्याची अनुभवीक माहिती असल्यामुळेंच त्यांस इतक्या थोड्या भांडवलांत दुकान सुरू करून तें चालवतां आलें. पहिल्या वर्षीं त्यांचा खर्च भागून वर्ष अखेर सुमारें पाउणशें रुपये नफा झाल्याचें आढळून आलें. दुसऱ्या वर्षापा-सून नफा वाढूं लागून आज प्रत्येक भागिदाराला, सर्व खर्च भागून वर्षाकाठीं कांहीं हजार रुपये नफा होत असावा असा अंदाज आहे.

सदरील गृहस्थांपेक्षां शिक्षणानें किंवा बुद्धीनें तुह्मी कमी अहां काय ? असा प्रश्न केल्यास शेंकडों तरुण ' नाहीं ! नाहीं ! ! ' असेंच उत्तर देतील. मग आह्मीं या तरुणांस विचारतों कीं ' तुह्मांला त्या गृहस्था प्रमाणेंच धंदा शिकतां येणार नाहीं काय ? ' अर्थात

आलाच पाहिजे. धंद्यांत शिरून यशस्वी होण्याचा हाच एक राजमार्ग आहे. तरुणानों ! 'दुसऱ्याकडे राहून प्रत्यक्ष काम करून पुरी माहिती करून घेतल्यावांचून पदरचा पैसा घालून धंदा करूं नका ! कराल तर बुडाल.' हा गुरुमंत्र फार महत्वाचा आहे. तो पूर्णपणें लक्षांत ठेवा.

या मंत्राकडे दुर्लक्ष केल्यामुळें कित्येक उत्साही, धाडशी व हुषार महाराष्ट्रीयांचें नुकसान झालें आहे. स्वदेशीच्या लाटेंत निघालेल्या दुकानापैकीं व धंद्यापैकीं बहुतेक बुडाले, याचें कारण अनुभवीक ज्ञान नाहीं हेंच होय. इकडून तिकडून मिळवलेल्या वरवर माहितीचे जोरावर काढलेल्या धंद्यांपैकीं बहुतेक बुडावयाचे आणि अनुभवीकज्ञान मिळवलेल्या लोकांचे बहुतेक धंदे फायदेशीर व्हावयाचे असा नियम आहे. आतां कधीं कधीं कांहीं गैर माहित लोक नुकसान सोसून अनुभवानें शहाणपण शिकत कसा बसा हातीं घेतलेला धंदा सांवरतात आणि कांहीं माहितगार मनुष्यहि अकल्पित कारणें घडून आल्यास बुडतात, परंतु हे निवळ अपवाद होत.

दादर येथें रहाणाऱ्या एका व्यापारी गृहस्थांनीं एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट सांगितली आहे. ते ह्मणतात 'व्यापारधंद्यांत पडावयाचें असेल तर शाळा सोडतांच व्यापाराकडे वळलें असतां व्यापाराला लागणाऱ्या गुणांची आपल्या अंगीं वाढ होते. पांच दहा वर्षें नोकरी केल्यास नोकरपेशाचे गुणांची वाढ होते, मग

धंद्यांत पडून धंद्याला लागणारे गुण संपादण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी ते गुण अल्पांशानेंच साध्य होतात, यामुळें धंद्यांत व्हावा तितका फायदा होत नाहीं. याकरतां शाळा सोडतांच व्यापारधंद्यांत पडावें.'

इतर कला किंवा विद्या ज्याप्रमाणें लहानपणापासून शिकल्यानें येतात, त्याचप्रमाणें व्यापाराचें आहे. ती एक विद्या आहे, आणि आज ती परकीयांच्या हातीं आहे. ती आह्मांला साध्य करावयाची आहे. ती साध्य करण्यास पुष्कळ सायास करावे लागतील हें उघड आहे. चटकन वर्ष सहा महिन्यांत ती साध्य होणें अशक्य आहे. पन्नास पाऊणशें रुपड्या मिळविण्याची विद्या शिकण्यास ह्मणजे म्याट्रिकची परिक्षा पास होण्यास किती श्रम करावे लागतात, किती वर्षें घालवावीं लागतात, किती पैसा खर्चावा लागतो, आवशी पहांटे दिव्याशीं बसून किती अभ्यास करावा लागतो बरें!! व्यापारधंदा ह्मणजे शेंकडों किंवा हजारों रुपये मिळविण्याची विद्या आहे, तेव्हां ती साध्य करण्यास निदान म्याट्रिक इतके श्रम घेऊन पैसा व वेळ खर्च करावयास नको काय? इतकी फलदायी विद्या तुह्मांला सहजासहजीं प्राप्त होईल अशी कल्पना करणें असमंजसपणाचें नाहीं का?

व्यापारी लोक तुमच्या दृष्टीनें अगदीं कमी शिकलेले असतात; ते शाळेंत शिकवली जाणारी विद्या शिकलेले नसतात हें खरें, पण लहानपणापासून ते व्यापारी विद्या शिकत असतात, त्यांनीं त्यांत

कित्येक वर्षे घालवलेलीं असतात; ती विद्या तुह्मांला शिकल्याशिवाय कशी येणार ! तुह्मीं शाळेंत शिकलेल्या पुस्तकीज्ञानामुळें, तुह्मांला ही व्यापारीविद्या त्यांचेपेक्षां लवकर साध्य होईल आणि त्यांत तुह्मीं पुढें मागें त्यांचेपेक्षांहि वरचढ व्हाल, पण तुह्मीं इंग्रजी शिकलेले ह्मणून ती एकदम तुमच्यापुढें हात जोडून येऊन उभी रहाणार नाहीं. ती शिकण्याकरतां श्रम करण्यास, आणि पैसा व वेळ खर्च करण्यास तुह्मीं तयार असाल तरच ती तुह्मांस साध्य होईल.

शिवाय ही विद्या परक्यांचे हातीं आहे, आह्मांला तिचें वळण नाहीं, परिस्थिती अनुकूल नाहीं, याकरतां आह्मांला अधीकच सायास पडतील हें लक्षांत ठेवून, म्याट्रिक होण्याकरितां, बी. ए. होण्याकरितां, डाक्टर होण्याकरतां, वकील होण्याकरतां, जसा आपण पैसा व वेळ खर्चून अभ्यास करून पडतील तितके श्रम करतों, त्याचप्रमाणें ही विद्या शिकण्यासहि पैसा व वेळ खर्चून अभ्यास करून पडतील ते श्रम केले पाहिजेत हें विसरतां कामा नये.

तुमच्यापेक्षां गरीब व बुद्धीनें कमी अशा कांहीं महाराष्ट्रीयांनीं ही विद्या साध्य करून हजारों रुपये मिळवले आहेत व आजहि मिळवीत आहेत. तुह्मीं मनांत आणाल तर तुह्मींहि या विद्येंत प्रवीण होऊन श्रीमंत व्हाल यांत संशय नाहीं.

---

# व्यापारी शिक्षण.

ज्यांना आपल्या मुलांना व्यापार धंद्यांत घालावयाची इच्छा असेल त्यांनीं पहिल्यापासून त्या दृष्टीनें त्यांना शिक्षण देण्याची व्यवस्था करावी ह्मणजे पुढें उमेदवारी करण्यांत फार वर्षे घालवावीं लागणार नाहींत आणि एखाद्या व्यापाऱ्याकडे उमेदवारी मिळणेंहि कठीण पडणार नाहीं.

मुलांना तोंडचे हिशेबाच्या रीती पूर्वी शिकवीत असत त्या जरूर शिकवाव्या. अलीकडे शाळांतून त्या शिकवीत नाहींत असें वाटतें. आपल्या प्रांतांतील, परप्रांतांतील व परदेशांतील वजन मापाची उत्तम माहिती करून घ्यावी, ह्मणजे पुण्यास पंचवीस रुपये पल्ला बाजरी आहे तर ती मुंबईस किती रुपये फरा पडेल हें चटकन् लक्षांत येईल. किंवा खानदेशांतून लोणी मागवावयाचें आहे तें तेथें रुपया शेर आहे तें मुंबईच्या शेरानें किती शेर होतें हें कळेल. व्यापार करणाराला अमेरिकेंत हंड्रेटवेटावर मिळणारें लोखंडी सामान येथें कसें मण पडतें; आणि इंग्लंडांत पौंडाचे दरानें विकणारे जिन्नस येथें रुपयाचे दरानें कसे पडतात हें हिशेब करीत न बसतां चटकन् लक्षांत आलें पाहिजे. याकरतां इंग्लंड, फ्रान्स, इटाली जर्मनी, अमेरिका, जपान, चीन वगैरे देशांतील वजना मापांची व

नाण्यांची पूर्ण माहिती करून देऊन, एक्सचेंज ह्मणजे हुंडणावळ अथवा वटाव वगैरे संबंधींहि माहिती अवश्य करून दिली पाहिजे.

मुलांना आपल्या बरोबर बाजारांत नेऊन पुढें हळूहळू त्यांचेवरच घरसामान आणण्याची जबाबदारी टाकावी. शेजाऱ्या पाजाऱ्याचेंहि सामानसुमान आणून देण्यास आळस करूं नये. या योगानें अनुभव वाढत जाऊन जिनसांची पारख करतां येऊं लागते, व्यापाऱ्यांची ओळख होते, पत वाढते, दरदामाची माहिती होऊन कसोशीनें माल खरेदी करतां येऊं लागतो, वजनामापांची माहिती होऊन व्यापाऱ्याच्या लबाड्या ऊर्फ खुब्या लक्षांत येऊं लागतात. तेव्हां या रीतीनें विद्यार्थ्यास अनुभविक ज्ञान मिळून किराणा माल व कापड वगैरे जिनसांची सहजासहजीं पारख व माहिती होते.

आपल्या गांवात किंवा प्रांतांत जे धंदे चालत असतील त्यांचीहि मिळेल तितकी माहिती मिळवण्यांत मुलांनीं आळस करूं नये सुटीच्या दिवसांत हाच उद्योग करावा. उदाहरणार्थ कापूस पिकत असलेल्या प्रांतांतील मुलांनी कापसाच्या जाती, त्या जाती कोठें पिकतात, कोणत्या जातीला किती भाव येतो, आपल्या आजूबाजूच्या गांवीं काय भाव येतो, किरकोळीचा दर काय, घाउकीचा दर काय, मुंबईचा दर काय, आगगाडीभाडें किती, खटारा हमाली, दलाली किती, वगैरे सर्व प्रकारची मिळेल तितकी माहिती मिळवीत असावें. निदान आपल्या आजूबाजूला जे व्यापाराचे

जिन्नस असतील त्यांची पूर्णपणें माहिती करून घ्यावी. मुख्यत्वें-करून जिनसांची पारख करावयास शिकावें. कापसाची पारख करणाऱ्या मनुष्याचा त्या धंद्यांत शिरकाव होऊन जम बसण्यास वेळ लागणार नाहीं. कोणत्याहि जिनसांची पारख असेल आणि त्याच्या दरदामाची माहिती असेल तर त्या जिनसाचा लहान प्रमाणावर धंदा सुरू करतां येतो. किंवा त्या जिनसाच्या व्यापाऱ्याकडे नोकरी मिळणें कठीण पडत नाहीं, आणि व्यापाऱ्याकडे नोकरी केल्यानें व्यापाराची सहजासहजीं संपूर्ण माहिती करून घेण्याची संधि मिळते. या करतां व्यापार धंद्यांत पडूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यानें कांहीं जिनसांची पारख करण्यास शिकावें, व त्यांची मिळेल तितकी माहिती मिळवीत असावें.

मुद्दाम लक्ष देऊन शिकल्यावांचून कोणत्याहि जिनसांची पारख करतां येत नाहीं. दरवर्षी प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचे घरीं, शेजारीं पाजारीं, नातलगांत, गावांत सोन्या मोत्यांची खरेदी होतच असते, व त्याचे आईचे, बहिणींचें, व बायकोचे आंगावरहि सोन्या मोत्यांचे दागिने असतात, पण किती सुशिक्षितांस सोन्या मोत्यांची पारख करतां येते ! गहूं प्रत्येक सुशिक्षित रोज खातो, पण गव्हांची पारख कितीकांना असते. त्याचप्रमाणें तांदूळ रोजचा खाण्याचा पदार्थ, पण त्याचीहि पारख करतां येत नाहीं. मुख्य मुद्दा हा कीं, कोणत्याहि जिनसाची पारख करावयास शिकलें पाहिजे,

तरच पारख करतां येते. शिकावयाचें या दृष्टीने ते जिन्नस पाहिले पाहिजेत. बरेच वर्षे त्या जिनसांचे दर दामाकडे व निरनिराळ्या जातींकडे लक्ष ठेवलें पाहिजे आणि आस्थेनें मिळेल तितकी माहिती मिळवून ती लक्षांत ठेवली पाहिजे. याला फार श्रम पडतात किंवा फार वेळ मोडतो असें नाहीं पण आस्थेनें शिकल्यावांचून ही विद्या येत नाहीं. आस्था असेल तर ही विद्या कोणालाहि शिकतां येण्यासारखी आहे. कोणत्या तरी एका जिनसाची पारख करण्यांत पटाईत व्हावें; ज्या जिनसाचा आपले आजूबाजूचे शहरीं किंवा प्रांतांत व्यापार चालत असेल त्याच जिनसाची पारख करावयास शिकून त्याच जिनसाची खरेदी विक्री करण्याचा व्यापार करूं लागणें अधिक सुलभ होईल.

व्यापारांत पडूं इच्छिणाऱ्या मुलांनीं आपल्या मातृभाषेकडे दुर्लक्ष करूं नये. मराठींत पत्र व्यवहार चांगला करतां येत असावा. कोणत्याहि विषयावर लहान निबंध भराभर लिहिण्याची संवय ठेवावी. आपल्याला जें काय बोलावयाचें आहे, तें थोडक्यांत, मुद्देसूद व स्पष्ट बोलण्याची संवय करावी. बोलणें गोड असावें. सर्वांशीं मोकळे पणानें बोलावें, कोणाला शब्दाने कधींही दुखवूं नये. त्याच प्रमाणें सभेंत किंवा चार चौघांत पांच दहा मिनिटें शुद्ध मराठीमध्यें न अडखळतां बोलण्याची संवय करावी.

मराठी झाल्यानंतर गुजराथी शिकावें. गुजराथीचा व्यापार धंद्यांत फार उपयोग होतो, पारशी, गुजराथी, मेमन, बोहरी, खोजे, वाणी, भाटे, मारवाडी वगैरे मोठ्या व्यापारी लोकांचा व्यवहार गुजराथींतच चालतो, आणि त्यांचे जवळ व्यवहार करण्याचा हरहमेश प्रसंग येत असतो, या करतां गुजराथी शिकल्यापासून फायदाच होतो. मुंबईस व्यापार करणारानें तर गुजराथी अवश्य शिकावें.

हिंदी देखील येत असावें. मद्रास इलाखा खेरीज करून हिंदुस्थानांतील कोणत्याही मनुष्यांना साधारणपणें व्यवहारापुरतें हिंदी समजतें. यामुळें हिंदी येत असेल तर सुशिक्षित, अशिक्षित सर्वांबरोबर व्यवहार करण्यास सुलभ होतें. हिंदी व गुजराथी या दोन्हीं भाषा शिक्षकावांचून शिकतां येण्यासारख्या आहेत. गुजराथी शिक्षक ह्मणून एक पुस्तक आहे तें घ्यावें. नंतर गुजराथी वर्तमानपत्रें, मासिकें व पुस्तकें वाचीत गेल्यानें ती भाषा आपोआप येऊं लागते. एखादा शब्द अडल्यास त्याचा अर्थ पहाण्याकरतां एक गुजराथी कोश आणून ठेवावा. हिंदी अक्षरें तर मराठी सारखींच आहेत. वाचावयास अडचण पडत नाहीं, व साधारणपणें अर्थहि लक्षांत येतो. या करतां प्रथमच एखादें हिंदी वर्तमानपत्र सुरू करावें आणि एक कोश आणवून अडतील त्या शब्दांचा अर्थ पहावा. एखादें व्याकरणाचें लहानसें पुस्तक आणून वाचल्यास आपल्यास शुद्धाशुद्ध कळूं लागेल या प्रमाणें या दोन्ही भाषा मराठी जाणणारास शिक्षकावांचून शिकतां येतात. कोणी शिकवणारा भेटेल तर उत्तमच.

मराठी व इंग्रजी जमाखर्चाची माहिती अवश्य पाहिजे. निदान मराठी तरी पाहिजेच. अकाउन्टन्सीचे वगैरे क्लास शहरांतून असतात, त्यांत शिकण्याचें जमल्यास पहावें.

इंग्रजी न अडखळतां थोडक्यांत व मुद्देसूद बोलतां येईल आणि पत्रव्यवहार करतां येईल इतकें येत असलें पाहिजे. टाईप रायटिंग शिकल्यास उपयोग होतो. फारिन एक्सचेंज, शेअर मार्केट, व सोनें, चांदी, कापूस, धान्य वगैरे जिनसांची चढउतार टाइम्स, क्रॉनिकल वगैरे पत्रांतून येत असते तिकडे लक्ष ठेवल्यास चांगलेंच.

जगांत काय चाललें आहे याची माहिती असावी. जगांतील उलाढालींचा बाजारभावावर व व्यापारधंद्यावर फार परिणाम होत असतो. याकरितां केसरी, टाइम्स, क्रॉनिकल यांसारखें एखादें वर्तमानपत्र वाचीत असावें. व्यापार विषयास वाहिलेलीं मराठी, इंग्रजी वर्तमानपत्रें, मासिकें सुरू करावीं. ठोकळ मानानें इतर प्रांतांची व परदेशाची माहिती मिळेल तितकी मिळवीत असावें. विशेषेंकरून कोणते जिन्नस कोठें पिकतात, कोठें विकतात, कोणत्या जिनसांचे कारखाने कोठें आहेत, कारखान्यांत दर काय, बाजारांत भाव काय वगैरे व्यापारविषयक माहिती मिळेल तितकी संग्रहीं ठेवावी. त्याकरतां एखादी चोपडीहि करून ठेवावी, नवीन कांहीं लक्षांत ठेवण्यासारखी माहिती, व्यापाऱ्यांचे व कारखानदारांचे पत्ते वगैरे लिहून ठेवावे. उपयोग होतो.

शक्य असल्यास प्रवास करावा. प्रवासवर्णनें वाचावीं, व्यापारी लोकांची ओळख करून घ्यावी, व्यापार धंद्यावरचीं पुस्तकें वाचावीं. व्यापारी डायरेक्टऱ्यांवर नजर टाकावी. अशा रीतीनें व्यापार धंद्यासंबधीं मिळेल तितकी माहिती मिळवीत असावें.

व्यापार धंदा करणाराला कालेजच्या शिक्षणाची जरूर आहे असें नाहीं. ज्यांचेजवळ भरपूर पैसा असेल आणि हौस असेल त्यांनीं पाहिजे तर बी. ए. व्हावें, परंतु साधारण प्रतीच्या मनुष्यांनीं बी. ए. होण्याकरतां वेळ व पैसा खर्च करीत बसूं नये. म्याट्रिकपर्यंत शिक्षण मिळालें ह्मणजे पुरे. मात्र मागें सांगितल्याप्रमाणें इंग्रजी, उत्तम लिहितां बोलतां येईल इतकी इंग्रजीची तयारी करण्यास चुकूं नये. व दुसऱ्या भाषा व विषयहि शिकण्यास आळस करूं नये. गरिबांनीं तर कालेजांत जाण्याच्या मुळींच भरीस पडूं नये. कारण बी. ए. झाल्यावर त्यांना व्यापाऱ्याकडे थोड्या पगारावर पडेल तें काम करून रहाण्याची लाज वाटते, आणि व्यापारी त्यांना जास्त पगार देऊन त्यांच्या योग्यतेप्रमाणें वागण्यास कबूल नसतात. यामुळें त्यांस नोकरपेशा पतकरल्यावांचून गत्यंतर नाहींसें होतें. श्रीमंताची गोष्ट वेगळी असते. त्यांचेजवळ भांडवल असल्यामुळें त्यांना एखादा माहितगार मनुष्य म्यानेजर अगर भागिदार घेऊन स्वतंत्र धंदा सुरू करतां येतो व नुकसान आल्यास तें सोसण्याचें त्यांना सामर्थ्य असतें. एकंदरींत मध्यम स्थितींतल्या किंवा गरीब विद्यार्थ्याला व्यापा-

रांत पडावयाचें असेल तर त्यानें कालेजांत जाण्याची हांव न धरतां म्याट्रिकपर्यंत शिकून व्यापाराला लागणारें वर सांगितल्याप्रमाणें शिक्षण मिळवून एखाद्या व्यापाऱ्याकडे किंवा लहानशा कंपनींत उमेदवारी अगर नोकरी पतकरावी. मोठ्या कंपनींत ह्मणजे जेथें शेंकड्यांनीं कारकून आहेत तेथें नोकरी धरल्यास धंद्याची संपूर्ण माहिती मिळवणें साधत नाहीं, पण अशा कंपनींत राहिल्यास पुढें मागें मोठ्या पगाराची जागा मिळण्याचा संभव असतो; तेव्हां ज्यांना स्वतंत्र धंदा करावयाची हांव आहे त्यांनीं अशा मोठ्या कंपनींत राहूं नये.

आपण व्यापारी विद्या शिकण्याकरतां राहिलों आहों, व गरज आपलपाला आहे हें लक्षांत ठेवून पडेल तें काम करण्यास कचरूं नये आणि प्रत्येक काम स्वतः करून अनुभवीक ज्ञान मिळववें. बारीक सारीक कामाकडेहि दुर्लक्ष न करतां तीं शिकावीं ह्मणजे पुढें फार उपयोग होतो. यूरोप व अमेरिकेंतील कोट्याधीशांपैकीं बहुतेक लोक गरिबींतून चढत चढत श्रीमंत झाले आहेत. त्यांचें सांगणें ‘ बारीक कामांकडे दुर्लक्ष करूं नका ’ असेंच आहे.

आपण पदरचें खाऊन फी देऊन शाळेंत जाऊन विद्या शिकतों, त्याचप्रमाणें वेळ पडल्यास बिन पगारी नोकरी करावी. मात्र आपण शिकण्याकरतां राहिलों आहों हें न विसरतां सर्व कामें शिकण्याकडे लक्ष ठेवावें. मुख्यत्वेंकरून पडेल तें काम करावें, न केल्यास मालक आपल्याला ठेवणार नाहीं, काढून टाकील. आमचे सुशिक्षित

तरूण अंगमेहनत करण्यास व त्रास सोसण्यास तयार नसतात; पण ही त्यांची चूक आहे. त्रास सोसल्यावांचून आणि खूप मेहनत केल्यावांचून परक्यांकडून विद्या शिकतां येणार नाहीं हें आमच्या तरुणांनीं लक्षांत ठेवावें.

मेहनत करण्याची व त्रास सोसण्याची तयारी नसेल त्यांनीं व्यापार धंद्याकडे वळूं नये. त्यांनीं खुर्ची टेबलावरची, आरामाची, पिढीजात चालत आलेली कारकुनी पतकरावी. व्यापारधंदा हा धक्काधक्कीचा मामला आहे. सुख्यासावलींत आरामांत बसून काम करणारांकरतां व्यापारधंदा नाहीं. व्यापारधंद्यांत पडणारानें होईल तो त्रास सोसण्यास, पडेल तें काम करण्यास, लागेल तितकी अंगमेहनत करण्यास, आणि येईल त्या अडचणींतून मार्ग काढण्यास तयार असलें पाहिजे.

परंतु आमच्या सुशिक्षित तरुणांस अंगमेहनतीचीं कामें करणें कमीपणाचें वाटतें व त्यांची त्रास सोसण्याची तयारी नसते. जेमतेम पोट भरण्यापुरत्या पगारावर कारकुनी करीत दुःखाकष्टांत जन्म घालवण्यास ते तयार होतील, पण अंगमेहनत करून व त्रास सोसून व्यापारधंद्यांत पडून श्रीमंत होण्यास तयार होणार नाहींत. येथील किराणा मालाचे एक व्यापारी सुशिक्षित मनुष्याला आपले दुकानांत ठेवण्यास तयार आहेत. मुंबईतील खर्च भागण्यापुरता सुरवातीला पगार देऊन जसजसा मनुष्य तयार होईल, तसतसा ते पगार वाढवतील. तसाच उत्तम मनुष्य असल्यास पुढेंमागें दुकानांत त्याचा भागहि ठेवण्यास ते

तयार होतील. परंतु त्यांस कारकुनी काम करणारे सभ्य गृहस्थाची जरूर नाहीं. सकाळीं आठपासून रात्रीं नऊपर्यंत दुकानांत राहून काम केलें पाहिजे. दुपारीं जेवणाकरतां तास दीड तास रजा आणि मधल्या वेळीं गिऱ्हाईक कमी असेल तेव्हां विश्रांती. इतकी मेहनत करण्यास सुशिक्षित तरुण तयार नसतात; याकरतां त्यांस अद्याप एकहि मनुष्य मिळाला नाहीं. मिळतात ते ज्यांना दुसऱ्या कोठें नोकरी मिळत नाहीं असे अशिक्षित सांगकाम्ये. तात्पर्य, फारशी मेहनत करावी न लागतां शिकण्याची सोय असेल तर आमचे सुशिक्षित तरुण व्यापारधंदा शिकण्यास तयार असतात.

मेहनत न करतां व्यापारधंदा शिकण्याचे दोन मार्ग आहेत. एक वर्षाचे चार पांचशें रुपये फीदाखल एखाद्या दुकानदाराला देऊन 'मला वाटेल तितकें काम करीन' असाच ठराव करून पदरचें खाऊन रहाणें; किंवा जवळ भरपूर पैसा असल्यास माहितगार म्यानेजर नेमून एकदम धंदा सुरू करून म्यानेजरनें पैसा खाल्यास किंवा अन्य कारणानें बूड आल्यास ती सोसण्यास तयार राहून ठकत ठकत शहाणपण शिकत अनुभव मिळवणें. हे मार्ग श्रीमंतांच्या लाडक्या मुलांकरतां आहेत. गरिबांना शारिरीक श्रम करून त्रास सोसून दुसऱ्याच्या दुकानांत किंवा कंपनींत राहून अनुभवीक ज्ञान मिळवणें हा एकच मार्ग आहे.

याप्रमाणें कोणत्याही धंद्याचें अनुभवीक ज्ञान मिळवल्यावर, आपल्या परिस्थितीप्रमाणें स्वतंत्र किंवा एखादा भागिदार घेऊन धंदा सुरू करावा. अथवा एखाद्या दुकानांत किंवा कंपनींत मुनीम किंवा म्यानेजर रहावें. एकदां पूर्ण माहिती झाल्यावर काय करावें हें ज्याचें त्याला ठरवतां येतें. तें त्याला आपोआप कळूं लागतें.

# कंपन्या.

हल्लीं व्यापार धंद्याला भांडवल फार लागतें. किरकोळ धंदा म्हटला तरी तो देखील थोड्या भांडवलावर चालवतां येत नाहीं. भांडवल तुटपुंजें असेल तर अनेक अडचणी उत्पन्न होऊन धंदा बुडण्याचा संभव असतो; कदाचित् मोठ्या मुष्किलीनें चालवला तरी त्यांत श्रमाच्या मानानें फायदा होत नाहीं. धंद्याला भांडवलाची तूट पडतां कामा नये, तरच तो यशस्वी करतां येऊन त्यांत भरपूर नफा मिळवतां येतो.

परंतु आमचे महाराष्ट्रीय बहुतकरून तुटपुंज्या भांडवलावर धंदा सुरू करतात. त्यांना पुरेसें भांडवल जमवणेंच फार कठीण पडतें. आधींच महाराष्ट्र इतर प्रांतांचे मानानें गरीब आहे. त्यांतून ज्यांचे जवळ थोडासा पैसा आहे ते तो ब्यांकेंत ठेवतात किंवा त्याची शेतीवाडी विकत घेतात. पण गुजराथी, वाणी, पारशी, भाटे, खोजे वगैरे लोकांजवळ पांच दहा हजार रुपये असले तर ते आपला पैसा ब्यांकेंत ठेवीत नाहींत, व्यापार धंदा करून, त्याची दुप्पट, चौपट, दसपट करीत रहातात; निदान एखाद्या व्यापाऱ्याला ब्यांकेपेक्षां दुप्पट तिप्पट व्याजानें देतात. महाराष्ट्रीय गृहस्थ सहसा असें करणार नाहीं. तो व्यापार धंद्याच्या फंदांत मुळींच पडणार नाहीं. 'बुडालों तर सर्वच जावयाचें.' हा विचार पहिल्यानें त्याचे मनांत येईल. ' बरें दुसऱ्या

कोणास दिले आणि त्याचें दिवाळें वाजलें तर त्याचें काय ग्या.' असें ह्मणून तो आपला पैसा व्यापारांत घालणार नाहीं किंवा व्यापाऱ्याला देणार नाहीं; फार झालें तर सोनें किंवा जमीन गहाण घेऊन व्याजीं लावील.

असें करणारांना आह्मीं दोष देतों असें नाहीं. आपला पैसा सुरक्षित कसा राहील हें पहाणें प्रत्येकाचें कर्तव्यच आहे. वस्तुस्थितीच, अशी आहे कीं, व्यापार धंद्यांत पडणारे बहुतेक महाराष्ट्रीय बुडतात असा सर्वसाधारण लोकांचा समज झालेला आहे. यामुळें व्यापार धंदा करूं इच्छिणारा मनुष्य कितीहि सच्चा असला तरी त्याला व्यापारांत यश येईलच अशी लोकांना खात्री वाटत नाहीं. एकंदरीनें नवीन धंदा काढणाराला भांडवल कसें जमवावें हा एक मोठा प्रश्न पडतो.

हा प्रश्न सोडवणें कठीण आहे. तो एकदम सुटणार नाहीं. महाराष्ट्रीयांना व्यापारधंद्यांत जसजसें यश येत जाईल, तसतसें भांडवल जमवणें अधीक सुलभ होत जाईल; पांचदहा वर्षांपूर्वींपेक्षां आज आमचे लोक व्यापार धंद्यांत अधीक मन घालूं लागले असून धंदे करणारांना भांडवल देण्यासहि ते पूर्वींइतके कचरेनासे झाले आहेत; तथापि व्यापार करूं इच्छिणारानें लहानपणापासून काटकसरीनें वागून स्वतःचें थोडेंबहुत भांडवल जमविलें पाहिजे. पैसेवाल्याला पैसेवाल्यावर भरंवसा असतो, गरिबावर नसतो, ह्मणून पैसेवाल्याला पैसे मिळतात. या करतां अत्यंत काटकसरीनें वागून थोडेंतरी

स्वतःचें भांडवल जमवावें ह्मणजे मराली दुसऱ्यांकडून भांडवल मिळवणें सुलभ होतें.

शिवाय देण्याघेण्यांत अत्यंत चोख राहून सचोटीबद्दल लोकांचा भरंवसा संपादन करावा. लोकांचे पैसे देण्याची मुदत कांहीं झालें तरी चुकूं देऊं नये. ठरलेल्या दिवशीं ठरलेल्या वेळीं पैसे नेऊन द्यावे. नेहमींच्या किरकोळ व्यवहारांतहि आळसानें किंवा हयगयीनें ठरलेली मुदत चुकूं देऊं नये. या योगानें आपली लोकांवर छाप पडते, व पत वाढते आणि पतीवर भांडवल जमवणें सोपें जातें.

आपण जो धंदा हातीं घेत आहों तो फायदेशीर रीतीनें चालवण्याचें आपल्या अंगीं सामर्थ्य आहे अशी लोकांची खात्री झालेली असल्यासहि भांडवल जमवणें सुलभ होतें. एखाद्या दुकानांत मुनीम ह्मणून किंवा एखाद्या कंपनींत म्यानेजर ह्मणून काम केलें असल्यास व्यापाऱ्यांच्या ओळखी होऊन पतीवर माल मिळूं शकतो. पैसेवाले भागिदार मिळतात आणि आपले पतीवरहि भांडवल मिळणें कठीण पडत नाहीं. एकंदरीनें धंद्याचें अनुभविक ज्ञान असेल तर कोणत्या ना कोणत्या मार्गानें भांडवल जमवतां येतें.

मोठमोठे धंदे करावयाचे असतील तर ते एकदम अंगावर घेणें शक्य नाहीं. पहिल्यानें लहान धंदे करून ते खूप फायदेशीर करून दाखविले ह्मणजे मोठ्या धंद्यांना भांडवल मिळण्यास फारशी अडचण

पडत नाहीं. मोठे धंदे काढावयाचे असतील तर त्यांना हल्लीं लाखों रुपयांचें भांडवल लागतें, तें लिमिटेड कंपनी काढूनच जमवलें पाहिजे. नांगर वगैरे लोखंडी सामानाचे कारखानदार किर्लोस्कर बंधू यांनीं पहिल्यानें अगदीं लहान प्रमाणावर धंद्याला सुरवात करून अत्यंत श्रमपूर्वक हळूहळू धंद्याची वाढ केली, व आपले आंगीं धंदा यशस्वी करण्याचें सामर्थ्य आहे हें सिद्ध केलें. यामुळें लोकांचा त्यांचेवर विश्वास बसून त्यांना लिमिटेड कंपनी काढतां आली. कांच-सामानाचे कारखानदार राजश्री ओगले यांनींहि पहिल्यानें धंदा यशस्वी करून दाखवून मग लिमिटेड कंपनी करून मोठें भांडवल जमवलें.

अशा तऱ्हेचीं उदाहरणें डोळ्यांपुढें ठेवून आपल्या परिस्थिती-प्रमाणें, आवडीप्रमाणें व हिमतीप्रमाणें एखादा धंदा हातीं घेऊन तो नेटानें चालवून त्यांत यश मिळवल्यास मोठी कंपनी उभारतां येईल. दिवसेंदिवस आपल्याला व्यापारधंदा करण्यास काळ अनुकूल होत चालला आहे, पुढें सरलेल्या महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांचीं व कारखान-दारांचीं उदाहरणें डोळ्यांसमोर आहेत, त्यांनीं पुढें होऊन थोडीशी वाट मळून ठेविली आहे, याकरतां त्यांना जितके टक्केटोणपे खावे लागले, आणि जितकीं वर्षें रखडावें लागलें तितके न रखडतां नवीन धंदेवाल्यांस यश मिळवतां येईल.

पैसा बुडण्याची धास्ती नाहीं आणि व्याज किंवा नफा भरपूर

मिळेल अशी खात्री होतांच आमचे महाराष्ट्रीय लोकहि शेअर विकत घेण्यास भराभर पुढें सरसावतात. टाटा कंपनीच्या लोखंडी कारखान्याचे, ब्यांकेचे, व इतर कारखान्याचे शेअर मध्यस्थाला कमिशन देऊन आमच्या लोकांनीं खरेदी केले आहेत. तेव्हां पैशाला बूड नाहीं आणि नफा भरपूर होईल अशी लोकांची खात्री पटवली असतां, स्नेही, सोबती, श्रीमंत व व्यापारीहि भांडवल देण्यास आनंदानें तयार होतील.

आमचे सुशिक्षित लोक व्यवहारांत चोख व प्रामाणिक असतात. शीलानें व बुद्धीनेंहि वरच्या दर्जाचे असतात. ते जर व्यापार धंद्यांत पडतील तर त्यांना भांडवल जमवणें अधीक सुलभ होईल. दोनचार समवमस्क व समानशील ग्राजुएट मिळून लहान लहान कंपन्या काढतील तर त्यांस भांडवल जमवणें कठीण पडणार नाहीं. माल चोख, पैसा रोख, एकच भाव, या तीन तत्वांवर जर ते दुकानें काढतील तर त्यांस गिऱ्हाईक हवें तितकें मिळेल. दिवसेंदिवस गिऱ्हाइकांचा ओढा एकच भाव असलेल्या दुकानांत माल घेण्याकडे वळूं लागला आहे. स्टोअर्स वगैरेंत एकभाव असतो, तेथें सुशिक्षित लोक हटकून जातात, पण अशिक्षितहि एकच भाव असेल तेथें माल घेऊं लागले आहेत. हा गिऱ्हाइकांचा कल ओळखून मुंबईस एकच भाव ठेवणारे दुकानदार बरेच वाढले आहेत. यापुढें मुंबईत व इतर लहान

महान शहरांतहि नवीन पद्धतीचीं दुकानें उत्तम चालतील. एकच भाव, पैसा रोख, माल चोख, शब्द गोड, हें धोरण ठेवून सुशिक्षितांनीं दुकानें काढल्यास फार फायदा होईल. जुन्या तऱ्हेच्या अनियमित, अव्यवस्थित, अप्रामाणिक, असभ्य, अशा लोकांशीं व्यवहार करणें दिवसेंदिवस लोकांना नकोसें झालें आहे. लोकांच्या या मनस्थितीचा फायदा घेऊन सुशिक्षितांनीं पुढें सरलें पाहिजे.

सुशिक्षितांवर लोकांचा स्वाभाविकपणेंच अधिक विश्वास असतो. त्यांतून पहिल्यापासून व्यवहार चोख ठेवल्यास, वायदा कधींहि चुकूं न दिल्यास, आणि बारीकसारीक गोष्टींतहि अत्यंत नियमितपणें व सचोटीनें वागत गेल्यास लोकांचा आपोआप विश्वास बसून पत वाढत जाईल. एकदां एखाद्या मनुष्याची पत वाढली ह्मणजे त्याला भांडवलाची तूट मुळींच पडत नाहीं. हजारों लाखों रुपयांचा व्यवहार त्याला पतीवर चालवतां येतो.

पत वाढल्यावर कंपन्याहि काढणें सोपें जातें. हल्लींचा काळ कंपन्यांचा आहे. यूरोपांत बारिकसारीक धंद्यापासून रेलवे, खाणीसारख्या कोट्यावधी रुपयांच्या मोठमोठ्या धंद्यांपर्यंत सर्व धंदे लिमिटेड कंपन्यांवर चालले आहेत. आह्मांलाहि तोच मार्ग स्वीकारला पाहिजे. ‘ दसका लकडी एकका बोजा ’ या न्यायानें हजारों किंवा लाखों रुपये भांडवल जमण्यास लिमिटेड कंपनी हाच एक

उत्तम मार्ग आहे. आमच्या महाराष्ट्रीय बंधूंनीं—विशेषेंकरून सुशिक्षितांनीं—याच मार्गाचें अवलंबन करावें ह्मणजे मोठमोठ्या धंद्यांस भांडवल कोठून आणावयाचें हा प्रश्न सुटेल.

# उन्नतीचा पाया.

सुदृढ शरीर प्रकृती हा उन्नतीचा पाया आहे. पायावांचून इमारत नाहीं, त्याचप्रमाणें सुदृढ प्रकृतीवांचून उन्नती नाहीं. प्रकृती चांगली नसेल तर मनुष्याचे हातून शारिरीक व मानसीक काम होणें कठीण पडतें, याचा अनुभव प्रत्येक मनुष्याला केव्हांना केव्हां तरी येतोच. दुखण्यांतून उठल्यावर शारिरीक काम तर होत नाहींच, पण वाचन, लेखन, विचार वगैरे मानसीक श्रमहि होईनासे होऊन स्मरणशक्ती कमी होते, बुद्धि मंद होते, युक्ती सुचेनाशी होते, उत्साह नाहींसा होतो, हौस जाते, महत्वाकांक्षा दबते, आणि मनुष्य हताश होतो; इतकें मन शरीरावर अवलंबून असतें. यावरून शरीर अशक्त झालें ह्मणजे मनहि अशक्त होतें हें सहज लक्षांत येईल. इंग्रजींत यावरूनच ‘ Sound mind in a sound body ’ ‘ शरीर खंबीर तर मन गंभीर ’ अशी ह्मण पडली आहे.

तेव्हां शारिरीक श्रमाचीं कामें करणारांना मजबूत शरिराची जितकी जरूर आहे, तितकीच मानसीक श्रम करणारांलाहि आहे. हें अत्यंत महत्वाचें तत्व आमचे सुशिक्षित लोकांस पटत नाहीं, पटलें तरी तें मनावर ठसत नाहीं, असें त्यांचीं दुबळीं शरीरें आणि नाजूक प्रकृती पाहून वाटूं लागतें. सुशिक्षित ह्मटला कीं तो अशक्त असावयाचाच, असा नियमच होऊन बसला आहे.

अलीकडे दहा पांच वर्षांत याला अपवाद नजरेस पडूं लागले आहेत. कांहीं शाळांतील व कालेजांतील विद्यार्थी तालीम करून शरीर उत्तम बनवून कुस्त्याहि मारूं लागले आहेत; पण ते अपवादादाखलच होत. शेंकडा नवद विद्यार्थी शरीरप्रकृतीकडे दुर्लक्षच करतात. त्यांतले त्यांत हुषार ह्मणून नांवाजलेले विद्यार्थी ह्मणजे निवळ पाप्याचीं पितरेंच असावयाचे. त्यांची प्रकृती नेहमीं बिघडत असावयाची, मेहनत सोसावयाची नाहीं आणि ह्यातून फारसें काम व्हावयाचें नाहीं; मग यांच्या विद्वत्तेचा उपयोग काय ? बिचारे उपाशींच मरावयाचे. पण त्यांच्या सुदैवानें सरकारला नोकर पाहिजे असतात ह्मणून यांना पोटाला तरी मिळतें. बाकी त्यांत सरकारचाहि फायदाच होतो. थोड्या पगारावर बुद्धिमान् व शिकलेलीं माणसें मिळतात. पुन्हां अगदीं गोगलगाई. वागवावें तसें वागायला तयार. नोकरी सोडून जातील ही धास्ती नाहीं, कारण यांच्या आंगांत पाणीच राहिलेलें नसतें या दुबळोपंतांचें मनहि दुबळेंच असतें. नोकरी गेली तर उपाशीं मरावें लागेल ह्मणून हे मरेमरेतों काम करतात, आणि लवकर मरून जातात. सरकारचा त्यांत दुहेरी फायदा आहे./थोड्या पगारांत उत्तम काम होतें, आणि पेन्शनचा खर्च वांचतो.

/ज्यांना नोकरीच करावयाची असेल त्यांनीं शरीराकडे एक वेळ दुर्लक्ष केले तरी चालेल, पण व्यापारधंदा करूं इच्छिणारानें आपलें शरीर सुदृढ करण्याकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे; विशेषेंकरून

गरिबांनीं 'शरीरसंपत्ती' हेंच आपलें भांडवल होय हें विसरूं नये. अत्यंत श्रम केल्यावांचून आणि पुष्कळ त्रास सोसल्यावांचून गरिबांचा व्यापारधंद्यांत जम बसत नाहीं; आणि शरीर मजबूत असल्यावांचून श्रम व त्रास सोसवत नाहीं. त्याहून बळेंच श्रम केल्यास आणि त्रास सोसल्यास प्रकृती बिघडून मुळींच काम होईनासें होतें; आणि मग सर्वच आशा व महत्वाकांक्षा जागच्या जागीं जिरून पोट भरण्याचीच पंचाईत पडूं लागते./

शरीर सुदृढ बनवण्याकडे लहानपणापासूनच दिलें लक्ष पाहिजे. अलीकडे आईबाप लहान मुलांचे शरीरप्रकृतीकडे द्यावें तितकें लक्ष देत नाहींत. मुलांना लहानपणीं भरपूर खेळूं द्यावें. खाणें पिणें नेमलेल्या वेळीं देत जावें; आणि त्यांना येतां जातां खाऊं देऊं नये. हें कठीण आहे असें नाहीं, पण तेंहि बहुतेक आईबापांचे हातून होत नाहीं. तीं त्यांना फाजील जपतात, मोकळेपणानें धांवूं खेळूं देत नाहींत, येतां जातां खाऊ देतात, चिवडा भजीं चारतात, आणि मुद्दाम चहा पाजून त्यांचें व्यसन लावतात. हेंच मुलें अशक्त व रोगी होण्याचें मुख्य कारण आहे. परमेश्वरानें त्यांना निरोगी व सशक्तच जन्माला घातलेलें असतें. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे मुलांचे खाण्यापिण्यांत व लाड करण्यांत नेमस्तपणा ठेवावा ह्मणजे मुलें निरोगी व सशक्त होतात.

प्रत्येक विद्यार्थ्यानें रोज एक तास निदान अर्धा तास तरी मोकळ्या शुद्ध हवेंत मर्दानी खेळ खेळावे. बायकांसारखें घरांत बसून राहूं नये. सकाळीं रोज सूर्याला नमस्कार घालावे. बारा नमस्कारांपासून सुरवात करून आपल्या शक्तीप्रमाणें वाढवीत जावे. नमस्कारांनीं सर्व शरिराला उत्तम व्यायाम होतो. रोज १०८ नमस्कार घालणाराचें शरीर उत्तम बनतें व प्रकृती चांगली रहाते. बरें, वेळहि फार मोडत नाही. ज्याप्रमाणें अल्पमोली, बहुदुधी, आंखुड शिंगी, पातळपोटी, कपिला गाय उत्तम; त्याचप्रमाणे नमस्कार हा व्यायाम उत्तम. घरच्याघरीं, थोड्या वेळांत, थोड्या जागेंत करतां येऊन शरीर पिळदार बनवून आरोग्य देणारा असा हा व्यायाम आहे.

आट्यापाट्या, खोखो, इटीदांडू हे आपले देशी खेळ अल्प खर्चाचे असून व्यायामाचे दृष्टीनें चांगले आहेत. या दृष्टीनें आट्यापाट्यांचा खेळ सर्वांत उत्तम, त्यांच्या मानानें क्रीकेट कमी प्रतीचा आहे. आट्यापाट्यांत सर्व गड्यांस एकदम खेळतां येतें. क्रीकेटमध्यें एका बाजूचे दोनच गडी खेळत असतात. दुसऱ्या बाजूचे गड्यांपैकींहि मैदानांत उभे असणाऱ्यांस सारखा व्यायाम होत नाहीं. उभें रहाण्यांत उगाच वेळ फुकट जातो. आट्यापाट्यांत सर्वांस एकदम खेळतां येतें. थोड्या वेळांत भरपूर व्यायाम होतो. मनुष्य सावध, समयसूचक व चलाख बनतो आणि शरीर स्वाधीन होतें. शिवाय या खेळास क्रीकेटचे मानानें खर्च नाहींच ह्मटलें तरी चालेल. सर्व देशी खेळ स्वस्त आणि सोईवार आहेत. पण इंग्रज राजकर्ते असल्यामुळें आह्माला

त्यांचें अनुकरण करण्यांत भूषण वाटतें. श्रीमंत, बडेलोक व राजे यांचें अंध अनुकरण करणें हा सर्वसाधारण मनुष्यस्वभावच आहे. त्याला इलाज नाहीं.

इंग्रजांचें अनुकरण करण्यांत भूषण मानणारांनीं पाहिजे तर क्रीकेट, फुटबाल, हाकी, टेनिस, काय हवे ते खेळ खेळावे, कोठून तरी व्यायाम करावा ह्मणजे झालें. निदान इंग्रजांसारखें सकाळ संध्याकाळ फिरावयास तरी जावें.

तालमेंत जाऊन किंवा घरीं जोर, जोडी, बैठका, वगैरे तऱ्हेचा व्यायाम केल्यासही चालेल, मात्र शरीर निवळ मांसल होऊं न देतां पिळदार बनवावें. जुन्या तऱ्हेच्या तालिमबाजांचें पोट मोठें व हात पाय लठ्ठ होतात, आणि पुढें तालीम सोडल्यावर त्यांचे आंगांत वात शिरतो. या करतां जोर, जोडी, बैठकांबरोबर मलखांब किंवा डंबेल्स करीत जावें. डंबेल्स विलायती खऱ्या, पण शरीर पिळदार बनवण्यास त्यांचा चांगला उपयोग होतो.

योगासनांचाहि शरीर निरोगी राखण्यास चांगला उपयोग होतो. यांतील कांहीं आसनें फार अवघड आहेत; पण कांहीं सोपीं, व सहज साधण्यासारखीं आहेत. पद्मासन, बद्धपद्मासन, उत्थित पद्मासन, मत्स्यासन, धनुरासन, उत्कटासन, कुक्कुटासन, शीर्पासन, मयूरासन, तोलांगुलासन, वगैरे आसनें सोपीं असून खोलींत बसून प्रकृती चांगली राखण्यास त्यांचा उत्तम उपयोग होतो. पारमार्थिक दृष्टयाहि पुढें मागें त्यांचा उपयोग झाल्यावांचून रहाणार नाहीं. त्याचप्रमाणें प्राणायामाचा प्रकृती निकोप राखण्याचे कामीं बराच उपयोग होतो.

खाण्यापिण्मांत नेमस्तपणा ठेवल्यानें प्रकृती सहसा बिघडत नाहीं. भजीं, चिवडा वगैरे तेलकट पदार्थ फारसे खाऊं नयेत. सात्वीक अन्न सेवन करावें. जागरणें चांगलीं नव्हत. तरीपण पुढें येईल तो पदार्थ खाण्यास कमी करूं नये व कारणपरत्वें जागरण करण्यास मागें घेऊं नये. विशेष पथ्यानें वागल्यास प्रकृती नाजूक होते.

प्रकृती उत्तम रहाण्यास सात्वीक अन्न, शुद्ध हवा, निर्मळ पाणी, भरपूर सूर्यप्रकाश, पुरेशी झोंप व घाम निघेपर्यंत व्यायाम हीं मुख्य साधनें आहेत. बहुतेक सुशिक्षितांचें अन्न सात्वीक असतें, मात्र मधल्यावेळीं भजीं चिवडा खाणें अपायकारक आहे, त्यापेक्षां दशमी फार चांगली, लाडू पुरीहि शक्य तर खावी किंवा पाव खाल्ला तरी चालेल पण नेहमीं भजीं चिवडा मात्र खाऊं नये. चहा हें एक निवळ व्यसन आहे. चहा अग्नी मंद करतो. नेहमीं चहा घेणाराचा आहार हटकून कमी होतो. एखादे वेळीं चहा घेतल्यानें तो बाधत नाहीं, पण एखादे वेळीं करतां करतां चहाची चटक लागते आणि मग चहा प्याल्यावांचून चैन पडेनासें होतें. चहाचें व्यसन, विडी तंबाकू पेक्षांहि लवकर लागतें. तंबाकू खावयास वाईट लागतो, त्यानें उचकी लागते, ओकारी येते; विडीनेंहि डोकें फिरतें, तोंड वाईट होतें व तिची घाण येते; परंतु चहाचें तसें नसून उलट तो लज्जतदार व गोड लागत असल्यामुळें त्याचें व्यसन चटकन लागतें, आणि तें सोडण्यास दारूच्या व्यसनाइतकेंच कठीण पडतें. दारु न पियाल्यास दारूबाजाचें जसें डोकें दुखूंलागतें व त्याला काम सुचेनासें होतें,

तसेंच चहाबाजाचें चहा न मिळाल्यास होतें; ह्मणून चहा मुळींच न पिणे हाच उत्तम मार्ग होय.

प्रकृती उत्तम रहाण्यास सर्वांत उत्तम साधन व्यायाम हेंच आहे. हल्लींचे तरुण शारिरीक मेहनत मुळींच करीत नाहींत. यूरोपिअनाप्रमाणें त्यांना ज्या त्या कामाला नोकर लागूं लागले आहेत, परंतु ते यूरोपिअनाप्रमाणें खेळावयास किंवा फिरावयास जाऊन रोज नियमानें व्यायाम करीत नाहींत. त्यांचे दुर्गुण घेऊन चांगले गुण घ्यावयाचे नाहींत हा शहाणपणाचा मार्ग नव्हे. यानें फार हानी होते.

आरोग्य चांगलें रहाण्यास नेहमीं शांतवृत्ती ठेवणें व सात्वीक गुणांची वाढ करणें फायद्याचें आहे. रागावणें, त्रासणें, द्वेष करणें यांनीं शरिराची खराबी होते.

तरुणांनीं पंचवीस वर्षेपर्यंत ब्रह्मचर्य पाळल्यास फारच फायदा होतो. मात्र ब्रह्मचर्य हें व्रत आहे, तें नीटपणें पाळलें तरच त्याचें फळ मिळतें. नुसतें अविवाहित राहिल्यानें कांहीं फायदा नाहीं. कुटुंबपोषणाचा भार अंगावर पडूं नये ह्मणून बरेच तरुण हल्लीं लवकर लग्न करीत नाहींत, परंतु ते व्रत या दृष्टीनें ब्रह्मचर्य पाळीत नाहींत. ब्रह्मचर्य नुसतें शारिरीक पाळून चालत नाहीं, तें मानसीकहि पाळलें पाहिजे, तरच त्याचें श्रेय मिळतें. शेक्सपिअर, कालिदास यांचीं नाटकें वाचणें, सिनेमा व नाटकें पहाणें, वगैरे प्रकारांनीं मानसीक ब्रह्मचर्य रहाणें शक्य नाहीं. याकरतां तरुणांनीं शृंगारिक नाटकें, पुस्तकें व देखावे वर्ज्य करून शृंगारविषयकविचारहि मनाला शिवूं

देऊं नये. लग्न होऊन संसार करूं लागल्यावर पाहिजे तर कादंबऱ्या नाटकें वाचून व पत्नीसमवेत नाटकें सिनेमा पाहून आपली हौस पुरी करून घ्यावी.

पंचवीस वर्षेंपर्यंत ब्रह्मचर्य उत्तम रीतीनें पाळल्यास, मनुष्याचे अंगीं ओज व तेज उत्पन्न होतें, हवें तें करण्याची दिक्कत वाटत नाहीं, अंगीं भरपूर उत्साह उत्पन्न होतो, मोठमोठीं कामें अंगावर घेऊन तीं पार पाडण्याची हौस वाटते. याकरतां शारिरीक आणि मानसीकहि ब्रह्मचर्य पाळावें.

लहानपणीं अशक्त असलेल्या मनुष्यालाहि व्यायामाचे बळावर तरुणपणीं सशक्त होतां येतें. प्रसिद्ध मल्ल प्रो० राममूर्ती हे लहानपणीं अशक्त होते. यूरोपियन मल्ल प्रो० सान्डो हाहि लहानपणीं अशक्तच होता. या दोघांनीं व्यायामाचे बळावर अद्‌भुत शक्ती कमावली. कै. टिळकहि लहानपणापासून अतीशय अशक्त होते, पण कालेजांत गेल्यावर एक वर्ष तालमेंत घालवून ते चांगले सशक्त झाले. तेव्हां लहानपणापासून अशक्त असलेल्या तरुणांसहि सशक्त होतां येतें. इतकेंच नव्हे तर तीस पस्तीस वर्षें वयाला होऊन गेल्यावर शरीर मजबूत बनवणारे लोक आहेत. पन्नास वर्षें वयाला होऊन गेल्यावर आपली बिघडलेली प्रकृती सुधारून आपलें शरीर पैलवानाप्रमाणें तयार केलेले लोकहि यूरोपांत आहेत. हे अपवाद सोडून दिले तरी तरुणांस आपली शक्ती वाढवून प्रकृती निकोप राखणें कठीण नाहीं.

———

# स्वावलंबन.

**जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ॥**

रामदास.

हें अक्षरशः खरें आहे. कोणतेंहि काम असो. तें दुसरा करील ह्मणून आपण स्वस्थ बसलों असतां तें होत नाहीं. एखादा मनुष्य गड्यामाणसांवर आपला बाग सोंपवून आपण स्वस्थ बसला तर बागांतील झाडांला वेळच्या वेळीं पाणी लागेनासें होतें, झाडें मरतात, नवीन लावलीं जात नाहींत, उत्पन्न कमी होऊं लागतें व चोरीस जातें, माल खराब होऊन त्याला भाव बरोबर येत नाहीं किंवा नासून कुजून जातो. अशा रीतीनें नुकसान होत जाऊन बागाची दुर्दशा होऊन तो उध्वस्त होतो. शेती, कारखाना, दुकान, वगैरे सर्व बाबतींत असेंच आहे. मालकाची नजर नसेल तर नुकसान झाल्यावांचून रहात नाहीं. मालक जितकें जास्त लक्ष देईल तितका जास्त नफा होतो. निदान नवीन उद्योग हातीं घेणारानें तरी अगदीं बारीक सारीक गोष्टींकडेहि स्वतः लक्ष्य द्यावें.

हल्लीं जगांत गरिबाचे लक्षाधीश व कोट्याधीश झालेले जे लोक आहेत, त्यांनीं सर्व बारीक सारीक कामेंहि स्वतः हातांनीं केलेलीं असून त्यांचें सर्व ठिकाणीं लक्ष असतें. ते कोट्याधीश झाले आहेत तरी रोज नियमितपणें हापिसांत येऊन सर्व कारभार स्वतःचे देखरेखीखालीं चालवतात. ' जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला. ' हें रामदास स्वामींनीं सांगितलेलें तत्व ओळखून युरोपिअन व अमे-

रिकन लोक दुसऱ्यावर न विसंबतां स्वावलंबनाचा मार्ग धरतात आणि आह्मीं फक्त तें तोंडानें ह्मणतों.

आमच्या लोकांना दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून राहण्याची किंवा दुसऱ्याच्या मदतीची आशा करण्याची फार वाईट खोड लागली आहे. खासगी कामांत काय, किंवा सार्वजनिक कामांत काय, मदत मिळणें हें स्वतःच्या कर्तबगारीवर अवलंबून असतें. हातीं घेतलेलें काम आपण उत्तम रीतीनें पार पाडूं अशी लोकांची खात्री झाली कीं, मदत आपोआप मिळते, आणि तशी खात्री झाली नाहीं तोंपर्यंत हातांपायां पडूनहि मदत मिळत नाहीं. God helps those who help themselves. ) जे स्वतःला साह्य करतात त्यांना परमेश्वर साह्य होतो हीच ह्मण खरी.

'दे ग बाई जोगवा' अशा तऱ्हेची भीक मागून पोट भरत नसतें. भिकेची हांडी शिक्यावर चढत नाहीं. त्याचप्रमाणें दुसऱ्याच्या मदतीनें कोणतेंहि काम होत नाहीं. स्वतःच्या हिमतीवरच सर्व कामें केलीं पाहिजेत. जें काम करण्याची स्वतःला हिम्मत नाहीं तें काम आंगावर घेऊं नये. आह्मी अशी मदत करूं, तशी मदत करूं, अशीं आश्वासनें पुष्कळ स्नेही सोबती व नातलग देतात, परंतु त्यांचेकडून वेळेवर मदत मिळत नाहीं व आपण तोंडघशीं पडतों. प्रत्येक मनुष्याला याचा थोडाबहुत अनुभव केव्हांना केव्हांतरी येतोच. याकरतां कोणाच्या मदतीवर अवलंबून न रहातां स्वतःच्या हिमतीवर कोणतेंहि काम आंगावर घ्यावें.

स्वावलंबी मनुष्यानें अडचणींना तोंड देण्यास तयार असलें

पाहिजे. कोणत्याहि कामांत अडचणी यावयाच्याच; त्यांतून हिमतीनें बाहेर पडलें पाहिजे. अडचणी आल्या कीं घाबरून न जातां दुप्पट तिप्पट मेहनत करून, आपली सर्व शक्ती एकवटून धडाक्यानें कामाला लागावें. सडकेवरून गाडा लोटीत नेत असतां, पुढें उंचवटा किंवा दगड धोंडा दिसला असतां, गाडा खूप जोरानें ढकलीत नेला असतां तो उंचवट्यावर न अडतां त्यावरून निघून जातो; त्याच प्रमाणें अडथळे किंवा अडचणींची गोष्ट आहे. सर्व शक्ती एकवटून धडाक्यानें उद्योग केला असतां, अडचणींतून पार पडतां येतें.

स्वावलंबी मनुष्याला ज्याप्रमाणें अडचणी अकल्पित येतात, त्याचप्रमाणें मदतहि अकल्पित मिळते. स्वावलंबनीं मनुष्याची हिम्मत उद्योग, महत्वाकांक्षा, मचोटी, चिकाटी, वगैरे गुण पाहून त्यानें हातीं घेतलेल्या कामांत त्याला यश येईल अशी सूज्ञ मनुष्यांची खात्री होते आणि मग एखादा सज्जन मनुष्य आपण होऊन मदत करण्यास पुढें येतो असा अनुभव आहे.

स्वावलंबी मनुष्याला अशी अकल्पित मदत मिळाली असतां, त्याचा उत्साह वाढून त्याला दुप्पट हिमत चढते व तो झपाट्यानें पुढें सरसावतो.

जगांत जे थोर पुरुष होऊन गेले व आजहि जे हयात आहेत, ते सर्व स्वावलंबी गृहस्थ असून त्यांनीं अडचणींतून मार्ग काढलेला आहे, इतकेंच नव्हे तर त्यांतले बहुतेक गरिबींतच वाढलेले आहेत. श्रीमंतींत वाढलेला मनुष्य कर्तबगार निपजून थोर पदाला चढला तर

तो अपवादच होय. गरिबी व स्वावलंबनयोग या आईबापांचे पोटींच थोरपणा जन्मतो.

कांहीं लोक ह्मणतात कीं, मला अमकी गोष्ट अनुकूल असती तर मी अमूक केलें असतें, तमकी अनुकूल असती तर तमूक केलें असतें; पण आपली नालायखी किंवा आळस लपवण्याकरतां या कोरड्या फुशारक्या आहेत. या लोकांना जितक्या गोष्टी अनुकूल आहेत, तितक्याहि अनुकूल नसलेल्या कितीतरी लोकांनीं, हातांत घेतलेलीं कामें उत्तम रीतीनें पार पाडलीं आहेत, तिकडे हे लक्ष देतील तर यांना लज्जेनें खालीं मान घालावी लागेल. महत्वाकांक्षी, उद्योगी, हिमती, निश्चयी व बुद्धिवान् मनुष्य कितीहि वाईट स्थितींत असला आणि त्याच्या मार्गांत कितीहि अडचणी आल्या तरी त्याची उन्नती झाल्यावांचून रहाणार नाहीं. केव्हांना केव्हां तरी त्याचा भाग्योदय होऊन तो थोर पदाला पोंचेलच पोंचेल.

स्वावलंबनाचें महत्व आत्मोन्नतीच्या दृष्टीनें फारच आहे. आपल्या आंगच्या गुणांची वाढ व्हावयास स्वावलंबन हाच एक मार्ग आहे. परावलंबी मनुष्याच्या आंगच्या गुणांची वाढ न होतां ते खुरटतात. मेहनत केल्यानेंच शक्ति वाढते. आपल्याकरतां दुसऱ्यानें मेहनत करून आपली शक्ति वाढणार नाहीं. आपण शिकल्यावांचून आपल्याला विद्या येणार नाहीं. पोंहावयाला आपण स्वतःच शिकलें पाहिजे; उन्हांतून फिरल्यानेंच आपल्या अंगीं ऊन सहन करण्याची शक्ती येते, थंडींत काम केल्यानेंच थंडी सोसूं लागते. याचप्रमाणें

मनुष्याच्या इतर सर्व गुणांचें आहे. त्यांचा उपयोग केला असतां त्यांची वाढ होते. हिमतीचीं कामें आंगावर घेतल्यानेंच हिम्मत वाढते, उद्योग केल्यानेंच उद्योगाची आवड उत्पन्न होते, बुद्धीचीं कामें केल्यानेंच बुद्धी वाढते. दुसऱ्यांनीं आपलीं कामें केल्यानें आपल्या आंगच्या गुणांची वाढ होत नाहीं. एकंदरींत दुसऱ्याची मदत घेतल्यानें आपल्या आंगच्या गुणांची वाढ होत नाहीं; उलट ते खुरटतात. ह्मणून (Self helf is the best helf.) स्वतःच्या मदतीसारखी उत्तम मदत नाहीं, हें लक्षांत ठेवून तरुणांनीं दुसऱ्याच्या मदतीवर अवलंबून न रहातां स्वावलंबनाचा मार्ग धरावा, ह्मणजे त्यांची उन्नती होऊन ते मोठ्या योग्यतेला चढतील.

# वेळाचा अपव्यय.

'गेली घडी पुन्हा येईना.' पैसा गेला तर पुन्हां मिळवतां येतो, पण गेलेला वेळ पुन्हां मिळवतां येत नाहीं. याच करतां Time is more valuable than money. पैशापेक्षां वेळाची किंमत अधीक आहे. ही ह्मण इंग्लिश लोकांनीं प्रचारांत आणली आहे. इंग्लिश लोक वेळाचा जितका सदुपयोग करतात, तितका आह्मीं करीत नाहीं. त्यांचे जे गुण घेण्यासारखे आहेत त्यांपैकीं हा एक आहे. आमच्यांतहि पूर्वीच्या वळणाचे कांहीं लोक नियमितपणें वागणारे आहेत. चाळीस पन्नास वर्षांपूर्वी असे लोक पुष्कळ होते. त्यांचा कार्यक्रम आंखलेला असे. ते लौकर निजत आणि पहांटे कोंबड्याबरोबर उठून उद्योगाला लागत. त्यांच्या कामाच्या व जेवणाखाण्याच्या वेळा ठरलेल्या असत, आणि ते स्वभावानें करारी व बाणेदार असत. त्यांची परंपरा आतां मोडली; आणि विलायती नियमितपणाहि आह्मीं उचलला नाहीं. यामुळें आमचा सर्व व्यवहार हल्लीं अनियमित आणि अव्यवस्थित झाला आहे.

साधारणपणें आमच्या कोणत्याहि कामांत नियमितपणा नाहींच ह्मटलें तरी चालेल. एखाद्या मनुष्याला भेटावयाला जावयाचें असो, किंवा कामाला जावयाचें असो, थोडाबहुत तरी उशीर व्हावयाचाच. अलीकडचे सुशिक्षित ह्मणविणारे लोक बूट पाटलोण आणि नेकटाय कालर घालून साहेबांची ऐट आणतात, पण त्यांचा नियमितपणा

शिकावयास विसरतात. साहेब रागावेल ह्मणून यांना धडपड करून आफिसांत वेळेवर जावें लागतें, परंतु इतर व्यवहारांत अनियमितपणाच. एखादी सभा सहा वाजतां भरावयाची ह्मणून जाहिर झालें असलें तरी ती सहाला कधींच सुरू व्हावयाची नाहीं. तास अर्धा-तास निदान पंधरा मिनिटें तरी उशीर व्हावयाचाच. लोक फार जमले नाहींत, एखादा बडा गृहस्थ यावयाचा आहे, अध्यक्षांचा पत्ता नाहीं, किंवा वक्त्याकडे बोलावणें गेलें आहे, मिळून कोणत्याना कोणत्या कारणानें तरी वेळेवर सभा सुरू व्हावयाची नाहीं. या अनियमितपणामुळें पुष्कळ लोकांचा वेळ फुकट जातो, कित्येकांना वेळेवर जेवण मिळत नाहीं, कोणाचीं दुसरीं कामें रहातात, मिळून सर्वांचेंच नुकसान होतें.

वेळ ह्मणजे त्याला कांहीं किंमतच नाहीं, अशा रीतीनें बहुतेक लोक वागत असतात. वास्तविक जितका वेळ फुकट जातो तितकें आयुष्य फुकट जातें. एकतास गेला ह्मणजे आपल्या आयुष्यांतला एक तास कमी झाला. आपग आपल्या आयुष्याला कितीतरी जपत असतों. प्रत्येक मनुष्याला आपण पुष्कळ जगावें असें वाटत असतें. आजारी मनुष्य वर्ष दोन वर्षें, किंवा चार सहा महिने जास्त जगण्याकरतां हवा तितका पैसा खर्च करण्यास तयार असतो, पण इकडे कित्येक महिनेच्या महिने व वर्षेंच्या वर्षें निवळ फुकट घालवतो याला काय ह्मणावें !

साधारण मनुष्य रोज तास दोन तास कांहीं एक न करतां इकडे-

तिकडे घालवतो. असा मनुष्य महिन्याचे कांठीं साठ तास ह्मणजे एका वर्षांत एक महिना फुकट घालवतो, बारा वर्षांत एक वर्ष फुकट गेलें. वास्तविक मनुष्याचा निमा वेळ झोंप, स्नान जेवणखाण यांत जातो. ह्मणजे बारा वर्षांत सहा वर्षें खरीं कामाचीं, त्यांतलें एक वर्ष फुकट गेलें, तें भरून काढावयाचें तर दोन वर्षें अधीक जगलें पाहिजे, ह्मणजे फुकट गेलेल्या वेळाचें काम करतां येईल. तेव्हां अशा रीतीनें तास दोन तास रोज फुकट घालवणारा मनुष्य बारा वर्षांत दोन वर्षें फुकट घालवतो. कांहीं लोक ह्मणतील कीं आमचे रोज दोन तास फुकट जात नाहींत; त्यांनीं एक दिवस रोजचें काम घड्याळ लावून एकहि मिनिट फुकट न दवडतां करून पहावें ह्मणजे दोहोंपेक्षांहि अधीक तास रोज फुकट जातात, अशी त्यांची खात्री होईल. सुशिक्षित किंवा कारकूनपेशाच्या मनुष्यांपैकीं शेंकडा पंचाणव लोक नोकरीवांचून दुसरा व्यवसाय करीत नाहींत. या प्रत्येकाचे रोज निदान दोन तास तरी फुकट जातात. असें घड्याळ लावून काम केलें असतां दिसून येईल.

कोणताहि सुशिक्षित मनुष्य रोज सहा किंवा आठ तास काम करून महिन्याचे कांठीं पन्नास पाऊणशें किंवा शें दोनशें रुपये मिळवतो. असा मनुष्य रोज दोन तास फुकट घालवतो ह्मणजे महिन्याचे दहा वीस किंवा पंचवीस चाळीस रुपये किंमतीचा वेळ फुकट घालवतो. दरमहा, शें पन्नास रुपये मिळवणारा मनुष्य महिन्याचे कांठीं दहा

वीस रुपये फुकट घालवील तर त्याला आपण मूर्ख ह्मणूं, पण बहुतेक लोक वेळ फुकट घालवणारे असल्यामुळें कोण कोणाला मूर्ख ह्मणतो ! !

आह्मांला कोणी मदत करीत नाहीं, आह्मांला शिक्षण मिळालें नाहीं, आमचेजवळ पैसा नाहीं, ह्मणून रडगाणें गाणारे लोक आपली केवढी संपत्ती फुकट घालवीत असतात. फावल्यावेळांत अभ्यास केला तर विद्वान् होतां येणार नाहीं काय ? लोकांची मदत कशाला पाहिजे. आपला वेळ फुकट घालवूं नका, वेळाचा सदुपयोग करा ह्मणजे तुह्मांला कोणाच्याहि मदतीची जरूर लागणार नाहीं. परमेश्वरानें तुमच्या आंगीं अद्भुत शक्ती दिली आहे. तुह्मांला आपली शारिरीक शक्ती वाढवतां येते, बुद्धि वाढवतां येते, स्मरणशक्ती वाढवतां येते, हवे ते गुण वाढवतां येतात. परमेश्वरानें प्रत्येक मनुष्याचे अंगीं सर्वगुण कमजास्त प्रमाणाने ठेवले आहेत, त्यांची हवी तितकी वाढ करतां येते. पण आपला अमूल्य वेळ कचऱ्यासारखा फुकट घालवतां कामानये, ह्मणजे हवें तें साध्य करून घेतां येतें.

एखाद्या मनुष्यानें आपल्या शेतांतलें धान्य फुकट घालवलें, किंवा बागेंतील फळें कुजून जाऊं दिलीं, अथवा इमारती लांकडें चुलीला लावलीं तर त्याला आपण हंसतों; परंतु आपण आपल्या स्वतःच्या आंगच्या कितीतरी अमूल्य गुणांचा असाच नाश होऊं देत असतों, याची कल्पना तरी आपल्या मनाला शिवते का ? लहानपणचा काळ सोडून दिला तरी आपल्याला समजूं लागल्यापासून आपण आपल्या

आंगच्या अमोलिक गुणांचा व शक्तीचा सदुपयोग करतों का ? आपल्या आंगचे कितीतरी गुण मातीमोल होऊन जातात; आपण या गुणांची वाढ करून त्यांचा सदुपयोग केला असतां आपला केवढा बरें फायदा होईल. प्रत्येक मनुष्याचे अंगीं कांहींतरी एक विशेष गुण असतो. एखाद्याचा गळा चांगला असतो. त्यानें फावल्या वेळांत गाण्याचा अभ्यास केला, रोज दोन तास, एक तास, निदान अर्धा तास नियमानें अभ्यास केला तर तो पांच दहा वर्षांत निदान एक दीड तपानें तरी उत्तम गवय्या बनेल; मग कीर्ती व संपत्ति दोन्हीही त्याला सहज प्राप्त होतील; पण फावल्या वेळाचा असा सदुपयोग करणारे लोक आमच्या या दुर्दैवी देशांत कोठें आहेत !

कोणाचा हात फार चांगला असतो, चित्रें काढण्यांत स्वभावतःच तो कुशल असतो, कोणी मूर्ती करण्यांत पटाइत असतो, कोणाच्या अंगीं काव्यशक्ति असते, कोणाच्या अंगीं वक्तृत्वशक्ती असते, कोणाला यंत्रांची घडामोड करण्याचा नाद असतो, कोणाला नक्षी-काम चांगलें साधतें, कोणाची रसायनशास्त्रांत उत्तम मती चालते; याप्रमाणें बहुतेक मनुष्यांचे अंगीं कांहींतरी विशेष गुण असतो. पोटाचा धंदा करून प्रत्येक मनुष्याला रोज तास दोन तास तरी फुरसुतीचा वेळ सांपडतो. हा वेळ आपल्या आवडत्या विषयाकडे लावला तर त्यांत प्राविण्य मिळून पैसाहि मिळेल; पण आळसांत वेळ घालवण्याची दुष्ट खोड जडूं देतां कामा नये. तरुणानों ! वेळ फुकट न घालवतां,

[stamp]

आपल्या आवडत्या विषयाकडे सांपडेल तितका वेळ लावाल तर तुमची कीर्ती होईल, पैसा मिळेल व आपल्या या प्रिय महाराष्ट्रांत, उत्तम गवयी, चित्रकार, मूर्तिकार, कवी, वक्ते, लेखक, रसायनज्ञ, यंत्रज्ञ, शोधक, गणिती असे अनेक विषयांत प्रवीण लोक तयार होऊन स्वतःचें दारिद्र नाहींसें करून महाराष्ट्राचें नांव दिगंतीं गाजवतील. बंगाल्यांत, जगदीशचंद्र बोस, प्रफुल्लचंद्र रॉय, रविंद्रनाथ टागोर वगैरे जगविख्यात लोक निपजूं लागले आहेत. महाराष्ट्रीय तरुणांनों! बुद्धिमत्तेंत तुह्मीं बंगाल्यांपेक्षां खास कमी नाहीं. तुह्मींहि त्यांचे-प्रमाणेंच आपल्या आवडीच्या विषयाला सर्वस्व वहाल तर नांव अजरामर कराल; निदान फावल्या वेळांत आपला आवडता विषय हातीं घ्याल तरी संपत्ती व मान मिळून तुमचें कल्याण होईल.

रोज एक तास नियमानें अभ्यास केला तर चार पांच वर्षांत एक भाषा उत्तम शिकतां येते. एक तास रोज अभ्यास करून एका तपांत कोणत्याहि एका विषयांत पारंगत होतां येतें. चार्ल फास्ट नांवाचा एक अमेरिकेंतील मोची फावल्यावेळांत रोज एक ता अभ्यास करून उत्तम गणिती झाला, नंतर इतर विषयांचा अभ्यास करून तो विद्वान् बनला. रोज एक तास वाचन ठेवून साधार शिकलेल्या मनुष्याला, दहाबारा वर्षांत विद्वान् होतां येतें. आ विद्वान् ह्मणून प्रसिद्ध असलेल्या लोकांचें शिक्षण शाळेंत किंवा क लेजांत इतर विद्यार्थ्यांप्रमाणेंच झालेलें होतें, पण पुढें नोकरी धं

REFBK-0001906